CMYK

**LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी**
*तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे*
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

गंमत भंडारी

बीड वर्ष ३६ वे अंक ६९ वा फोन २३०१०१ दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 | RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

**रियांश एन्टरप्राईजेस**
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

# बजरंगबप्पांऐवजी दानवेंनीच सांगितलं की बीडच्या रेल्वेला ४ हजार १५७ कोटी आले

बीड दि.५ (प्रतिनिधी):- नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात नगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकारने ४ हजार १५७ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. मात्र याची माहिती जिल्ह्याचे खासदार म्हणून नेहमीच रेल्वे प्रश्नांवर बोलणारे बजरंगबप्पा सोनवणे यांनी देणे अपेक्षित होते. बजरंगबप्पांना कदाचित माहिती मिळाली नसेल परंतु माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी पत्रकार परिषद घेऊन बीडच्या रेल्वेसह मराठवाड्यातील इतर रेल्वे मार्गासाठी १४ हजार कोटींचा निधी मंजूर केला असल्याची माहिती दिली आहे.

## बप्पा, तुम्ही लक्ष घाला आणि मुंबई, पुण्यापर्यंत रेल्वे सुरु करा

**खा.बजरंगबप्पा यांनी बीडच्या रेल्वे प्रश्नात लक्ष घालावे. प्रत्येक १० दिवसाला कामाचा आढावा घ्यावा, आपण आतापर्यंत केंद्र शासन आणि रेल्वे विभागाकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने काय काय बदल झाले हे जाणून घेणे आवश्यक आहे. सध्या विद्युतीकरणाचे काम वेगात सुरु आहे. त्यामुळे आता बीड ते मुंबई, पुण्यापर्यंत रेल्वे सुरु करण्या संदर्भात आपण स्वत: पाठपुरावा करावा. त्याच बरोबर बीड ते वडवणीपर्यंत हायस्पीड रेल्वे चाचणी यशस्वी झालेली आहे. आता त्यापुढे परळीपर्यंतचे काम गतीने कसे होईल यासाठी देखील खा.बजरंगबप्पांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.**



मराठवाड्यासाठी महत्त्वाचे असलेल्या अहमदनगर- बीड-परळी, जालना- जळगाव आणि नांदेड- वर्धा या रेल्वे मार्गांसाठी तब्बल १४ हजार कोटींची तरतूद केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. शिवाय छत्रपती संभाजीनगर शहराला सीईआर प्रोग्राम अंतर्गत निधी मिळणार असल्याची माहिती माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिली. जालना शहरातील भाजप जिल्हा कार्यालयात बुधवारी ४ फेब्रुवारी रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार नारायण कुचे, महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, नगरसेवक राजेश राऊत व इतरांची उपस्थिती होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात सर्वच क्षेत्रासाठी पान २ वर

## रेल्वे फाटकाचं तेवढं बघा

केंद्रीय अर्थसंकल्पात बीडच्या रेल्वेसाठी आता मोठी तरतुद झालेली आहे. त्यामुळे खा.बजरंगबप्पा सोनवणे यांनी आता काम करुन घेण्याच्या अनुषंगाने स्वत: लक्ष घालावे. अहिल्यानगरकडून बीडकडे येत असतांना चऱ्हाटा रोडवर असलेल्या रेल्वे फाटकासाठी कंट्रोल रुम नाही, नगरकडून येत असतांना आणि बीडकडून नगरकडे जात असतांना रेल्वे थांबवून फाटक टाकावे लागते. देशात काय जगात कुठेच रेल्वे फाटकाच्या बाबतीत असा प्रकार नाही. याचे व्हिडीओ सुद्धा व्हायरल झालेले आहेत. त्यामुळे आता बप्पांनी लक्ष घालावे आणि रेल्वे फाटका संदर्भात निर्णय घ्यावा.

# माजलगाव नगराध्यक्ष पतीची न.प. कर्मचाऱ्यास मारहाण

### काही काळ तणाव ; रात्री उशिरापर्यंत पोलिसात गुन्हा दाखल नव्हता

माजलगाव दि.५ (प्रतिनिधी):- माजलगाव नगर परिषदेमध्ये निवडणुकीला साधारणतः दोन महिने लोटले. नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदीपदी एक महिण्यापूर्वी विराजमान झालेल्या उपनगराध्यक्ष सहाल चाउस यांच्या सुनबाई शिफा बिलाल चाउस यांनी पदभार घेतला मात्र एक महिण्याचा कार्यकाळ होत नाही तोच नगराध्यक्षांचे पती बिलाल सहाल चाउस यांनी नगर परिषदेतील कर्मचारी अक्षय अंकुश धारक यांना क्षुल्लक कारणावरून मारहाण केल्याची घटना घडली असुन हे प्रकरण माजलगाव शहर पोलिस स्टेशनपर्यंत गेले होते परंतु गुन्हा जरी दाखल झाला नसला तरी मात्र कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले असुन शहरात उलट-सुलट चर्चा सुरू आहे.
नगर परिषदेतील काही कर्मचारीही प्रशासकीय काळापासून नागरिकांना छोट्या पान २ वर

### पदाधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यावर वचक नाही कर्मचाऱ्यांना मारहाण करणे अयोग्य -भाजपचे ज्ञानेश्वर मेंडके

माजलगाव नगर परिषद कर्मचाऱ्यावर पदाधिकाऱ्यांचा वचक दिसून येत नाही त्यामुळे नागरिकांना पालिकेत कामकाजासाठी त्रास सहन करावा लागत आहे परंतु पदाधिकाऱ्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी कर्मचाऱ्यांना मारहाण करणे अयोग्य आहे कर्मचाऱ्यांना पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या कामासंदर्भात बैठका घेऊन सूचना केल्या पाहिजेत व नागरिकांना कामे करीत असताना अडवणूक होऊ नये असे काम करणे गरजेचे आहे. काल नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना जी मारहाण नगराध्यक्षांच्या पतीने केली आहे ती अयोग्य असल्याचे मत भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी व्यक्त केले आहे.

## स्व.अजितदादांच्या निधनामुळे शिवजयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

बीड दि.५ (प्रतिनिधी):- राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री, दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे बीड येथे बीड शहर सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने दरवर्षी साजरे होणारे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान सकाळी ७.०० वा. होणाऱ्या शासकीय महापूजा आणि अभिवादन सभेस मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर च्या वतीने करण्यात आले आहे.
गेल्या ३० वर्षांपासून बीड शहरात, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहराच्या आयोजनातून डीजेमुक्त आणि पान २ वर

## सर्व काही जळून खाक झाले असतानाही विमानातली कागद कशी जळाली नाहीत? कारण...



मुंबई दि.५ (वृत्तसेवा):- राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला अपघात झाल्यानंतर सर्वकाही जळाले मात्र विमानातील कागदपत्र तसेच घटनास्थळी सुरक्षित आणि फडफडत असल्याचे दिसून आले. त्यामुळे एवढे जळून खाक झाले मग कागद कशी झाली नाहीत असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.
या संदर्भात एका व्यक्तीने सोशल मीडियावरून दावा केला आहे की , जेव्हा विमान (Learjet 45) जमिनीवर आदळले, तेव्हा इंधनाच्या टाकीचा स्फोट होण्यापूर्वीच आघाताचा मोठा धक्का बसला. कागद आणि मॅन्युअल्स वजनाने अत्यंत हलके असतात. जमिनीवर आदळल्याबरोबर निर्माण झालेल्या हवेच्या दाबामुळे (Blast wave) आणि वेगामुळे हे हलके कागद मुख्य ढिगाऱ्यापासून ५०-१०० फूट दूर फेकले गेले. विमानाचा मुख्य सांगाडा आणि इंजिन एकाच जागी होते, जिथे इंधन (ATF) सांडल्याने भीषण आग लागली. कागदपत्रे या बर्न झोन (Burn Zone) च्या पान २ वर

### भगीरथ हरपला.. गेवराई शहरावर शोककळा

# एकनाथ लाड यांचे निधन

### आज सकाळी ९ वाजता अंत्यविधी



**गेवराई दि.५ (प्रतिनिधी):- अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि गेवराई नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथआप्पा लाड यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे उपचार सुरु असताना दुःखद निधन झाले आहे. गेवराईचे भगीरथ म्हणून ओळख असलेल्या एकनाथ लाड यांच्या निधनाचे वृत्त समजताच शहरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पत्नी कविताताई लाड या नुकत्याच नगरसेवक म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आलेल्या आहेत. एक निस्पृह नेतृत्व आणि अनुभवी असे ते व्यक्तिमत्व होते.**

या बाबत अधिक माहिती अशी की, गेवराई नगर परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ लाड हे दि. २७ डिसेंबर रोजी अचानक आजारी पडल्याने त्यांच्यावरअगोदर गेवराई आणि नंतर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यांच्या तब्येतीत पाहिजे तशी सुधारणा होत नसल्याने त्यांना पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे हलवण्यात आले.
येथे तब्येतीत चांगली सुधारणा होत असताना दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी अचानक प्रकृती ढासळली आणि याच त्यांची प्राणज्योत मालवली. पान २ वर

## UPSC च्या नियमांत मोठा बदल

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसेवा):- केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) ४ फेब्रुवारी २०२६ रोजी नागरी सेवा परीक्षेची (CSE 2026) अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. यंदा आयोगाने आपल्या नियमावलीत क्रांतिकारी बदल केले असून, प्रामुख्याने सेवा पान २ वर

# कपिलधारमध्ये बालविवाह

### दोन्ही वरबाप, वरमाई, वऱ्हाडींसह देवस्थान ट्रस्टी, सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल

बीड दि.५ (प्रतिनिधी):- कपिलधार देवस्थान या ठिकाणी एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दोघांच्याही आई-वडिलांसह, नातेवाईक आणि ५० ते ६० वऱ्हाडी यांच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी अधिकारी, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे यांनी फोनद्वारे माहिती दिली की, आज दुपारी १२ वाजता कपिलधार देवस्थान ( ता. बीड ) येथे एका १६ वर्षाच्या मुलीचा बालविवाह होणार आहे. त्यावरून, पोउपनि.पल्लवी जाधव , तत्वशील कांबळे हे सहकाऱ्यांसह कपिलधार देवस्थान येथे दाखल झाले. तेथे दोन, तीन विवाह सुरू होते आणि गर्दी देखील मोठ्या प्रमाणावर होती त्यामुळे पोलीस आणि सामाजिक कार्यकर्त्यांची टीम पहिल्या हॉलमध्ये दाखल झाली. तेथे गेल्यावर पो.उप नि. पल्लवी जाधव यांनी एका महिलेला नवरी मुलीचे नाव विचारले असता तिने मुलीचे नाव चुकीचे सांगितले म्हणून टीम तेथून बाहेर पडणार तोच मुलीचे आडनाव विचारले तर ते बरोबर सांगितले. त्यामुळे मुलीला ताब्यात घ्यायला टीम जाणार तोच वऱ्हाडी मंडळीला पोलीस असल्याचा संशय असल्याने त्यांची पान २ वर

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत राऊत यांची खोचक टीका

मुंबई दि.५ (प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणातील सध्याच्या घडामोडींवर ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी खोचक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

पान २ वर

**हॉल किरायाने देणे आहे**
शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, बँक, पतसंस्था इत्यादीसाठी 45 x 70 साईज असलेला अंबिका चौक, पांगरी रोड, बीड येथील हॉल किरायाने देणे आहे.
:: संपर्क ::
9960701880
9130209809
P.P.




CMYK

# शेतातील माती चोरुन नेली, तक्रार देऊनही कारवाई नाही

## ■ शेतकऱ्याची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार ■

बीड दि.५ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील मौजे घोडका राजुरी येथील एका शेतकऱ्याच्या शेतात जेसीबी मशीन व टिप्परच्या साह्याने माती चोरीचा प्रकार सुरु आहे. या बाबत पिंपळनेर पोलीस ठाण्यात, तहसिलदारांकडे तक्रार करुनही काहीच कारवाई न केल्याने शकीलखान कादरखान व इतर शेतकऱ्यांनी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे.

बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील शकीलखान कादरखान, मीरानखान कदीरखान, आक्रमखान कादरखान आणि सोहेलखान मोईनखान यांनी पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मौजे घोडका शिवारात आमच्या नावावर १०० आर जमीन आहे. आम्ही कामा निमित्त बीड येथे रहात असल्याने गावाकडे कमी जाणे येणे होते. दि.२० जानेवारी २०२६ रोजी आमच्या शेतात जेसीबी मशीन व टिप्परने दोघे जण काहीतरी करीत असल्याचे समजले. आम्ही त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता बाबु पवार आणि त्याचा मुलगा मिठू पवार हे दोघे आमच्या शेतात खड्डा करुन टिप्परमधून माती घेऊन जात असल्याचे दिसून आले. यावेळी त्यांना विचारपूस केली असता त्यांनी आम्हालाच धमकी देऊन वाद केला. आमच्या शेतात जवळपास १०० फुट लांब आणि ४० फुट रुंदीचे ७ ते ८ फुट खोल खड्डा दिसून आला. यामुळे आमचे ८ ते ९ लाखाचे नुकसान झाले आहे. या संदर्भात २० जानेवारी रोजी पिंपळनेर पोलीस आणि बीड तहसिल कार्यालयाकडे तक्रार करुनही अद्याप कोणतीच कारवाई झाली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनाही २७ जानेवारी २०२६ रोजी अर्ज देऊन कारवाईची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणात अद्यापही कसलीही कारवाई किंवा प्रतिबंध करण्यात आलेला नाही. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी यामध्ये लक्ष घालून न्याय द्यावा अशी मागणी शकीलखान कादरखान व इतरांनी निवेदनात केली आहे.

### बीड तालुक्यात मोफत वाळू वितरणातून घरकुलधारकांना दिलासा

# पारगाव सिरस आणि अंथरवन पिंपरी येथे शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण



बीड दि.५ (प्रतिनिधी):- राज्य शासनाच्या मोफत वाळू वितरण धोरणामुळे बीड तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झळाळी दिसू लागली आहे. घरकुलासाठी लागणारी वाळू मिळवताना येणारा आर्थिक ताण, अवैध वाळूची अडचण आणि वाहतुकीचा खर्च या सगळ्यातून सामान्य ग्रामीण कुटुंबांना मुक्त करण्याचा प्रयत्न प्रत्यक्षात साकार होत असल्याचे चित्र बीड तालुक्यात दिसून येत आहे.

माती, दगड, वाळूवर उभं राहतं घर
पण आधार मिळतो तो
शासनाचा हातभार

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची काटेकोर अंमलबजावणी बीड जिल्ह्यात सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे विभागस्तरावर वेळोवेळी आढावा घेत मार्गदर्शन करत असून, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. घरकुलधारकांना मोफत वाळू मिळालीच पाहिजे यासाठी जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्यासोबत सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या बैठका घेतल्या आहेत. सूचना दिल्या आहेत. त्याचाच परिपाक म्हणून जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरकुल धारकांना मोफत वाळू मिळत आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवत उपलब्ध वाळू, प्रस्ताव आणि वितरण याबाबत समन्वय साधला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि प्रभारी गौण खनिज अधिकारी नरेंद्र कुलकर्णी यांनीही या प्रक्रियेला प्रशासकीय दिशा दिली आहे.

घरकुलांची मोठी गरज,
मोफत वाळूचा मोठा आधार

बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३४३ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यापैकी २३ हजार ३८६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या सुमारे ७ हजार १०० घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू हा अत्यावश्यक घटक आहे. हीच गरज लक्षात घेऊन शासनाने मोफत वाळू वितरणाचा निर्णय घेतला आहे.



विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड येथे शेख अलीम शेख हुसेन यांच्या सेवापूर्ती समारंभात भालशंकर परिवाराकडुन सत्कार करण्यात आला.

# शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रणिता गंगाखेडकर यांना चंपावती भूषण पुरस्कार प्रदान

बीड दि.५ (प्रतिनिधी):- प्रणिता गंगाखेडकर, शिक्षण विस्तार अधिकारी, बीड यांना माननीय अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने आयोजित चंपावती महोत्सव पर्व चौथे अंतर्गत चंपावती भूषण पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सन्मान महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक विस्तारासाठी केलेले योगदान तसेच सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या उपक्रमांची दखल घेऊन प्रणिता गंगाखेडकर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या प्रसंगी विविध मान्यवर, शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक



मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना प्रणिता गंगाखेडकर यांनी हा सन्मान सर्व सहकारी, मार्गदर्शक व कुटुंबीयांना समर्पित करत पुढील काळातही शिक्षण आणि समाजासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## मेघालयमध्ये अवैध कोळसा खाणीत भीषण स्फोट, १८ कामगारांचा मृत्यू

शिलाँग दि.५ (वृत्तसेवा):- मेघालय राज्यात एक मोठी दुर्घटना घडली आहे. मेघालयातील एका अवैध कोळसा खाणीत स्फोट झाल्यानं १८ जणांचा मृत्यू झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबाबत शोक व्यक्त केला आहे. या घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना २-२ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मेघालयमधील जयंतिया हिल्स जिल्ह्यात कोळसा खाणीत स्फोट झाला. यात जवळपास १८ जणांचा मृत्यू झाला. मेघालयमधील जयंतिया हिल्स अवैध कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात १८ जणांचा मृत्यू झाला. तर, इतर अनेक जण अडकले असण्याची शक्यता आहे. पोलीस महासंचालक आई नोंगरंग यांनी माहिती दिली आहे. ही घटना थांगस्कू भागात घडली. बचाव कार्य सुरु आहे. आमच्या हाती १६ मृतदेह लागले आहेत. स्फोट झाला तेव्हा खाणीत किती लोक उपस्थित होते, यासंदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही. पंतप्रधान कार्यालयानं नरेंद्र मोदी यांची पोस्ट शेअर केली आहे. मेघालयमधील पूर्व जयंतिया हिल्समध्ये झालेल्या दुर्घटनेनं व्यथित झाल्याचं नरेंद्र मोदी म्हणाले. ज्यांनी या घटनेत जीव गमावले त्यांच्या प्रति मोदींनी सहवेदना व्यक्त केल्या आहेत.

पान १ वरून

## दानवेंनी सांगितले बीडच्या रेल्वेला ४ हजार ९५७ कोटी आले

भरीव तरतूद केली असून, देशाला प्रगतीकडे नेणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी आणि मराठवाड्यासाठीही भरीव तरतूद करण्यात आली आहे. मराठवाडा वॉटरग्रीडसाठी तांत्रिक आणि आर्थिक मदतीची तरतूद करण्यात आली आहे. अहमदनगर- बीड- परळी या मार्गासाठी ४ हजार ९५७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. जालना-जळगाव रेल्वे मार्गासाठी ५ हजार ८०४ कोटी रूपये निधीस मंजुरी देण्यात आली आहे. नांदेड- वर्धा रेल्वेसाठी ३ हजार ४४५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात ५ वर्षांत सीईआर प्रोग्राम अंतर्गत ५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार छत्रपती संभाजीनगर शहरासाठी पुढील पाच वर्षात आर्थिक, औद्योगिक आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी निधी मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

इंडस्ट्रियल टाऊनशिपसाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे. यात छत्रपती संभाजीनगर या ऑरिक सिटीचा समावेश होतो. त्यामुळे मराठवाडा हे राज्याचे नवीन मॅन्युफॅक्चरिंग हब बनेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रेल्वेसाठी १५ हजार कोटी

महाराष्ट्रातील रेल्वे क्षेत्राच्या विकासासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात १५ हजार ९४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. २००९ ते १४ च्या तुलनेत हा निधी १३ पट अधिक आहे. त्याशिवाय हवाई वाहतूक, रस्ते व पर्यटन, कृषी, उद्योग व इतर क्षेत्रासाठीही भरीव तरतूद करण्यात आल्याचे ते म्हणाले.

## एकनाथ लाड यांचे निधन....

डॉक्टरांनी सायंकाळी ३:४५ वाजता त्यांचे निधन झाल्याचे जाहीर केले. या एक महिन्यात एकनाथ लाड यांना वाचवण्यासाठी डॉक्टरांनी जिकरीने प्रयत्न करून उपचार केले. त्यांच्या कुटुंबियांनी संयम आणि मोठ्या धीराने सर्व उपचार देण्याचा आटोकाट

प्रयत्न केला. दरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार लक्ष्मणराव पवार, बाळराजे पवार, राज्य आरोग्य विभागाचे ओमप्रकाश शेटे यांनीही वेळोवेळी डॉक्टरांशी संपर्क साधून एकनाथ लाड यांच्या तब्येतीबाबत विशेष लक्ष देण्याच्या सूचना करत कुटुंबीयांनाही धीर दिला. मात्र सर्वांचेच प्रयत्न असफल झाले.

एकनाथ लाड यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून प्रदीर्घ काळ जनसेवा करताना त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिला. त्यांचा मनमिळावू स्वभाव आणि कामाप्रती असलेली निष्ठा नेहमीच सर्वांसाठी प्रेरणादायी राहील. नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष, नगर परिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन, नगर परिषद पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख आणि कालाविष्कार प्रतिष्ठानचे पदाधिकारी अशा विविध पदांवर त्यांनी काम करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी नगरसेवक कविताताई लाड, मुलगा प्रथमेश आणि मुलगी प्राजक्ता असा परिवार आहे.

एकनाथ लाड यांच्या जाण्याने लाड परिवारासह संपूर्ण गेवराई शहरावर शोककळा पसरली आहे. आज दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर परिसरातील स्मशान भूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. लाड परिवाराच्या दुःखात दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहोत.

## माजलगाव नगराध्यक्ष पतीची कर्मचाऱ्यास मारहाण

कामासाठी अडवणूक करून आर्थिक लूट करताना दिसून येत होती, या प्रकाराला नागरिकही वैतागले होते.

दोन महिन्यापूर्वी येथील नगर परिषदेच्या निवडणुका होऊन शिफा बिलाल चाऊस या निवडून आल्या होत्या. त्यांनी पदभार घेऊन एक महिनाच उलटला नाही तोच नगराध्यक्षांचे पती बिलाल सहाल चाऊस यांनी नगरपालिकेतील आस्थापना विभागातील कर्मचारी अक्षय धारक यांना पीटीआर द्यायला पैसे का मागितलेस म्हणून नगरपालिकेत येत अक्षय धारक यांना खाली बोलावून त्यांना मारहाण केल्याची घटना घडली. हा प्रकार चालू असताना येथे कामानिमित्त आलेल्या नागरिकांनी हे भांडण सोडवले व पुढे होणारा अनर्थ टाळला. या प्रकरणी शहर पोलिसात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. कर्मचाऱ्यास मारहाण केल्यानंतर इतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नगराध्यक्ष पतीची दादागिरी सहन केली जाणार नसल्याचे कर्मचाऱ्यांमधून सांगण्यात येत आहे असा प्रकार झाल्यास आम्ही आंदोलन छेडणार असल्याचे कर्मचाऱ्यातून सांगण्यात आले.

## कपिलधारमध्ये बालविवाह

पळापळ सुरू झाली. एवढ्या गर्दीत पल्लवी जाधव यांनी मुलीला ताब्यात घेतले व गर्दीचा फायदा घेवून नवरदेव मुलगा पळून गेला. हॉलमध्ये हजर असलेल्या व पळणाऱ्या लोकांना थांबायला सांगून त्यांना पल्लवी जाधव यांनी बालविवाह प्रतिबंध अधिनियम बाबत जनजागृतीपर मार्गदर्शन केले. पीडित मुलीला विश्वासात घेवून तिचे समुपदेशन केले व तिला तिच्या लग्नाबाबत विचारपूस केली असता, तिने सांगितले की, तिचा पिंपळाचीवाडी (ता. शिरूर कासार जि. बीड) येथील २४ वर्षीय तरुणासोबत झाला आहे. सदर पीडित मुलगी, तिचे आई - वडील व मामा तसेच नवरदेव व त्याचे आई - वडील फरार झाल्याने त्याचे मामा व नातेवाईकांना ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी पो.स्टे. बीड ग्रामीण येथे हजर करण्यात आले होते. नवरदेव व त्याच्या आई - वडिलांना पोलिस ठाण्यात हजर होण्याबाबत वऱ्हाडी मंडळीला सूचना दिल्या. बालविवाहाचा गुन्हा दाखल करणेकामी बालविवाह प्रतिबंधात्मक अधिकारी, श्रीराम वीर ग्रामपंचायत अधिकारी पाली बीड यांना घटनेची फोनद्वारे सर्व माहिती देवून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. आल्यावर त्यांनी पीडितेशी व तिच्या आई वडिलांशी संवाद साधून सर्व माहिती घेतली. याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी वीर यांच्या फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ९, १०, ११ बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये ८ आरोपी तसेच इतर ५० ते ६० वऱ्हाडी मंडळी व देवस्थान ट्रस्टी व सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पल्लवी जाधव यांनी पीडित मुलीच्या काळजी व संरक्षणासाठी तिला बालकल्याण समिती बीड यांचे समक्ष हजर करणे बाबत तपास अधिकारी यांना सूचना दिल्या आहे. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली, पीएसआय पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, पोलिस शिपाई अक्षय जाधव सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत टीका...

राऊतांनी विशेषतः सुनील तटकरे यांच्यावर टीका करत म्हटले आहे की, राष्ट्रवादीचे सुनील तटकरे शरद पवारांना मार्गदर्शन करतात, ही गम्मत वाटतेय. सध्याच्या राजकीय परिस्थितीत अजित पवारांच्या गटामधील विलीनीकरणाची प्रक्रिया जोरात सुरु आहे, असे राऊतांनी सांगितले. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार गटाकडून विलिनीकरणावर जोर देण्यात येत आहे. मात्र, अजितदादा गटातील शरद पवार यांचे एकेकाळचे चेलेच या विलिनीकरणाला विरोध करत असून पवारांना मार्गदर्शन करताना दिसत आहेत, असा खोचक टोला राऊत यांनी लगावला आहे. अजित पवार गटाचे नेते ज्या पद्धतीने भूमिका मांडत आहेत, त्यावरून स्पष्ट होते की शरद पवार आणि त्यांच्या पक्षाला या विलीनीकरणात पूर्णपणे सहभागी करून घेण्याची अजितदादांच्या गटाची इच्छा नाही, असा दावा करतानाच अमित शाह आणि नरेंद्र मोदींचीही तशीच इच्छा असावी, असा चिमटाही त्यांनी काढला.

## अजितदादांच्या निधनामुळे शिवजयंतीचे आयोजित सांस्कृतीक कार्यक्रम रद्द

वर्गणी मुक्त असणारी शिवजयंती, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आदर्श पद्धतीने साजरी केली जाते. सालाबादप्रमाणे यंदाही जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दुःखद पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, यावर्षी शिवजयंती कोणतेही जल्लोषी कार्यक्रम न करता साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा

परंपरेप्रमाणे सकाळी ७.०० वा. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहरचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी तसेच विविध मान्यवर यांच्या हस्ते शासकीय महापूजा आणि अभिवादन करून साधेपणाने शिवजयंती साजरी केली जाणार आहे. शासकीय महापूजा आणि अभिवादन कार्यक्रमासाठी दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वा. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## विमानातली कागदं कशी जळाली नाहीत ?

बाहेर पडल्याने ती आगीच्या भक्ष्यस्थानी पडली नाहीत असा दावा सध्या सोशल मीडियावरून केला जात आहे.

## यूपीएससीच्या नियमात बदल...

वाटप (Service Allocation) आणि डिजिटल सुरक्षेवर मोठा भर दिला आहे. नवीन नियमांमुळे आता प्रशासकीय सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांना पुन्हा परीक्षा देऊन रँक सुधारणे पूर्वीसारखे सोपे राहणार नाही.

UPSC ने केलेले हे महत्त्वाचे बदल

१. कार्यरत IAS आणि IFS अधिकाऱ्यांना परीक्षेबंदी

UPSC ने जाहीर केलेल्या नवीन नियमांनुसार, जे उमेदवार आधीच IAS (भारतीय प्रशासकीय सेवा) किंवा IFS (भारतीय वन सेवा) मध्ये नियुक्त झाले आहेत आणि त्या पदावर कार्यरत आहेत, त्यांना पुन्हा नागरी सेवा परीक्षा देता येणार नाही. तसेच, जर एखाद्या उमेदवाराची मुख्य परीक्षेच्या (Mains) निकालापूर्वी या दोन सेवांपैकी एका सेवेत नियुक्ती झाली, तर त्याला मुख्य परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारली जाईल.

पान ६ वरून

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या

परवाना प्रक्रिया सुलभ करणे: राज्यांतर्गत व्यापाराचे ठिकाण बदलल्यास नवीन परवाना घेण्याऐवजी जुनाच परवाना 'स्थानांतरित' करण्याची सोय मिळावी. तसेच, मुख्य परवान्यातच गोदामाचा पत्ता नोंदवून ते चालवण्याची परवानगी असावी.नॉमिनी (वारसदार) तरतूद: बँक खात्यांप्रमाणेच कृषी परवान्यात 'नॉमिनी' नोंदवण्याची सुविधा असावी. परवानाधारकाच्या निधनानंतर व्यवसाय बंद पडू नये, यासाठी वारसदाराला परवाना हस्तांतरित करण्याची आणि आधीच प्रशिक्षण घेण्याची मुभा मिळावी. या न्यायोचित मागण्यांचा विचार करून आगामी विधेयकांमध्ये त्यांचा समावेश करावा, जेणेकरून कृषी विक्रेत्यांना 'ईज ऑफ डूइंग बिझनेस'चा प्रत्यक्ष लाभ मिळेल, अशी आशा राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री यांनी व्यक्त केली आहे.

## पाटोदा प्रीमियर लीगचा 'संघर्ष योद्धा' विजेता

योद्धा आणि अण्णा वॉरियर्स यांच्यात झाला आणि तो शेवटच्या क्षणापर्यंत प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारा ठरला. अण्णा वॉरियर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारत आठ षटकांत तीन गडी बाद शंभर धावांचा डाव उभारला. अमीर याने धडाकेबाज फटकेबाजी करत अल्प चेंडूंमध्ये धावांचा वेग वाढवला, तर तुषार धोले याने संयम राखत डावाला स्थैर्य दिले.लक्ष्याचा पाठलाग करताना संघर्ष योद्धा संघाने सुरुवातीपासूनच आत्मविश्वास दाखवला. सात षटकांत तीन गडी बाद लक्ष्य गाठत त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. प्रसाद भाकरे याच्या आक्रमक फलंदाजीने सामना आपल्या बाजूने वळवला, तर संतोष हुळे याने निर्णायक क्षणी जबाबदार खेळ करत संघाला विजयी रेषेपलीकडे नेले. अखेरच्या षटकांतील जलद धावा आणि संयमित खेळामुळे अंतिम सामना स्मरणात राहणारा ठरला. स्पर्धेतील विजेत्या व उत्कृष्ट संघांसाठी प्रथम पारितोषिक एक लाख एक रुपये, द्वितीय एक्काहत्तर हजार रुपये, तृतीय एक्कावन्न हजार रुपये आणि चतुर्थ एकतीस हजार रुपये अशी आकर्षक बक्षीस रक्कम देण्यात आली. पारितोषिक वितरण तहसीलदार दत्तात्रय निलावड, मुख्याधिकारी अभयजी जोशी, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, सभापती किरण शिंदे पाटील बळीराम पोटे,ॲड.जब्बार पठाण उपनगराध्यक्ष रोहिदास गीते शरद बामदळे , रामेश्वर गोरे, हनुमंत काळे, बालाजी जाधव, संदीप दादा जाधव, जय जाधव, किशोर आढगळे, अरविंद सरवदे गटनेते, सभापती, नगरसेवक, पत्रकार, वकील आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

## आ.धस यांच्या तत्परतेमुळे

उपचाराचा खर्च मोठा असल्याने गोरगरीब कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले होते व कुटुंबीय चिंतेत होते. ही बाब गणेश नाना शिंदे यांच्या माध्यमातून आमदार सुरेश धस यांच्या निदर्शनास येताच, आमदार धस यांनी तत्काळ मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाशी संपर्क साधून आवश्यक पत्रव्यवहार केला. तसेच सर्व कागदपत्रांची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना अमर वाळके यांना दिल्या. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर दिनांक ५ फेब्रुवारी रोजी कृष्णा चखाले यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ६० हजार रुपयांची मदत मंजूर झाली.

ही मदत मिळाल्याने चखाले कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत कृष्णा चखाले यांचे भाऊ अक्षय चखाले यांनी सांगितले की, आमदार सुरेश धस यांच्या वेळेवर केलेल्या प्रयत्नांमुळे आमच्या कुटुंबावर आलेल्या मोठ्या संकटात आधार मिळाला. तसेच गणेश नाना शिंदे आणि अमर वाळके यांनीही आम्हाला मोलाचे सहकार्य केले. याबद्दल आम्ही सर्वांचे मनापासून आभार मानतो. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी तत्काळ समजून घेऊन प्रभावी पाठपुरावा करणारे आमदार सुरेश धस हे केवळ लोकप्रतिनिधी नसून, संकटात धावून येणारे खरे अर्थाने जनतेचे आधारवड ठरत असल्याची भावना यानिमित्ताने पुन्हा एकदा व्यक्त होत आहे.

## लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी डॉ.गणेश ढवळे यांची निवड

निवडीनंतर सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी, गावातील शांतता, सलोखा आणि सौहार्द वाढविण्यासाठी डॉ. गणेश ढवळे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.महाराष्ट्र शासनाने माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत, गावातील वाद-विवाद गावपातळीवरच सामोपचाराने मिटवण्यासाठी तंटामुक्ती समितीची स्थापना करण्यात आली आहे. या निवडीनंतर बोलताना डॉ. गणेश ढवळे यांनी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी दाखवलेला विश्वास सर्वांच्या सहकार्याने सार्थ करेन, अशी ग्वाही दिली. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे,शंकर वाणी, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अक्षय वाणी,बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड,मोहन कोटुळे, केशव गिरे, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहाय्यक अशोक लोखंडे,विष्णु गर्जे, आसराजी वीर,अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, यमुना आबदार, प्रतिक्षा शिंदे,यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जामखेड शहर अतिक्रमणाच्या विळख्यात

बाजूंच्या जागांचे उतारे व खरेदी खतानुसार पाहणी करून संबंधित अतिक्रमणे तात्काळ हटवावीत,अशी मागणी पवार यांनी केली आहे. सदर अतिक्रमणांमुळे शहराचा विकास रखडला असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

## धारूर शहरातील पेठ विभाग शिवजयंतीच्या अध्यक्षपदी

बिभीषण गायकवाड,संजय फावडे, ॲड मोहन भोसले, बाळासाहेब गायकवाड, बालाजी चव्हाण, गौतम चव्हाण, सत्यप्रेम औताडे, प्रभाकर फावडे,सुनील कावळे, डॉ. नवनाथ चव्हाण, सुरेश शेळके या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात येते. यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग अध्यक्षपदी गुलाब गायकवाड, उपाध्यक्षपदी पवन औताडे, कोषाध्यक्षपदी पवन औताडे, सचिव रोहित फावडे,यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मिरवणूक प्रमूख, अमित गायकवाड,नाना चव्हाण,आशिष भोसले, ऋषिकेश फावडे, तुषार औताडे, निखिल फाटे, विकी चव्हाण, रोहित फावडे, शिवराज औताडे, कृष्णा गायकवाड, गजानन फावडे, प्रशांत चव्हाण,रवी गायकवाड, बबलू गायकवाड,महेश खवतोडकर, एकनाथ औताडे, दत्ता फावडे, अमर पंडीत, राम फावडे, बाळू भोसले, वैभव चव्हाण,टिल्लू तट, योगेश अंधारे, बबलू सावंत, रोहित गायकवाड, सूरज गायकवाड, अमोल सिरसाट ,अजित फावडे,तर यावेळी बैठकीसाठी शिवभक्त सतिराम जेधे, मोणू औताडे, गौरव चव्हाण, प्रथम गायकवाड, प्रणव औताडे, शिवराज भोसले, गौरव चव्हाण, श्याम फावडे, आमर भांवडलकर, विनय शिंदे, ऋषी गायकवाड, योगेश सावंत, सोनु शिंदे, अमर वैष्णव, विशाल चव्हान, रुपेश सावंत, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते.

## प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजींच्या उपस्थितीत कड्यात विविध कार्यक्रम

उपस्थित असणार आहेत. शनिवारी होत असलेल्या या कार्यक्रमांमध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत कार्यक्रम असणार आहेत यामध्ये सकाळी विविध वेशभूषेमध्ये मोतीलाल कोठारी विद्यालयातील विद्यार्थी तसेच संस्थेच्या सर्व विभागातील विद्यार्थी यांच्या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. रॅली नंतर संस्थेच्या प्रांगणात परमपूज्य आदर्श ऋषीजी महाराज यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. त्याचबरोबर जैन धर्मातील ज्येष्ठ श्रावक आणि श्राविका यांचा सन्मान केला जाणार आहे. तसेच या प्रसंगी संस्थेच्या बोर्डींग मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित केला आहे.

या कार्यक्रमासाठी कडा शहरातील श्री वर्धमान स्थानकवाशी जैन श्रावक संघ, अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ आणि वर्धमान महावीर ट्रस्ट संचलित इंग्लिश स्कूल कडा यांचे पदाधिकारी उपस्थित असणार आहेत. परमपूज्य आदर्श ऋषीजी महाराज यांचा कडा शहरांमध्ये तीन दिवस आगमन असणार असून शुक्रवारी श्री वर्धमान महावीर ट्रस्ट संचलित इंग्लिश स्कूल कडा येथेही महाराज यांच्या उपस्थितीत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या सन्मान सोहळ्यासाठी जास्तीत जास्त बहीणी, जावई तसेच ज्येष्ठ श्रावक-श्राविका आणि माजी विद्यार्थी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## शस्त्राचा धाक दाखवून लुटमार

रोहिदास कांबळे (रा. साखरे बोरगाव, ह.मु. बीड) हे जिल्हा परिषद कार्यालयासमोर पत्र्याच्या शेडचे काम करत होते. त्यावेळी आरोपी सय्यद अनवर व त्याचा साथीदार यासिन खान पठाण (रा. बीड) यांनी तेथे येऊन फरशी कुऱ्हाड व तलवारीचा धाक दाखवत, सुमारे २५ हजार रुपयांचे वेल्डिंग मशीन, कटर मशीन आणि ड्रिल मशीन जबरदस्तीने लुटून नेले होते. या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३२३/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुख्य आरोपी सय्यद अनवर हा गुन्ह्यानंतर हैदराबाद येथे पळून जाऊन पोलिसांना चकवा देत होता. दरम्यान, गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे तो बीडमध्ये आल्याचे समजताच पोलिसांनी सापळा रचून त्याला जिल्हा परिषद परिसरातून ताब्यात घेतले.त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तो अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असल्याने त्याच्यावर पुढील काळात कडक पोलिस निगराणी ठेवण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या सूचनेनुसार बीड शहर पोलीस गुन्हेगारांविरुद्ध कडक मोहीम राबवत आहेत. शहरात दहशत माजवण्याचा किंवा अशा प्रकारचे गुन्हे करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव व त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## यश ढाका हत्या प्रकरणातील आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

कृष्णा विजेंद्र सोनवणे आणि सुरज काटे असे एकूण चार आरोपी सध्या अटकेत आहेत. यापैकी सोमनाथ काटे, निखील घोडके आणि कृष्णा सोनवणे यांनी जामीन मिळावा यासाठी जिल्हा सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता.दि. २ फेब्रुवारी रोजी या जामीन अर्जांवर सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने या तिघांचाही जामीन अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे तिघांनाही पुढील सुनावणीपर्यंत न्यायालयीन कोठडीतच राहावे लागणार आहे.या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. अजय राख आणि ॲड. मिलिंद वाघीरकर यांनी प्रभावी बाजू मांडली. तपास यंत्रणांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, न्यायालयीन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## सवसवाडी येथे ओंकारेश्वर शिवमंदिरात आज महादेव व नंदी मूर्ती प्राणप्रतिष्ठा

बीड दि.५ (प्रतिनिधी)- शिरूर कासार तालुक्यातील सवसवाडी येथील मंदिरात शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांच्या शुभहस्ते श्री महादेव आणि नंदी मूर्ती पणप्रतिष्ठा व कलशारोहण आष्टी, पाटोदा शिरूरचे आ. सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सवसवाडी येथे भाविक भक्तांनी लोकवर्गणी करून नव्यानेच भव्य शिवमंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामध्ये श्री महादेव, नंदी मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दिनांक ५ फेब्रुवारी रोजी सकाळी मूर्तीची शोभायात्रा, कुंडसंस्कार, होमहवन, तर दिनांक ६ रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व होमहवन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ५१ फूट उंच धर्मध्वज आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते उभारण्यात येणार आहे. भाविक भक्तांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सवसवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मादळमोही अर्बन बँकेत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली

कोळगाव दि ५(प्रतिनिधी)-- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनामुळे राजकारणात मोठी हानी झाली असून त्यांच्या विषयी सर्व स्तरातून शोकसभेतून भावना व्यक्त करत आहेत. दरम्यान गेवराई तालुक्यातील मादळमोही अर्बन बँकेत दि.४ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मा.अजित दादा पवार यांनी मादळमोही जिल्हा परिषद सर्कल मध्ये दुष्काळ परिस्थितीत चारा छावण्या आणि फळबागेची पाहणी केली होती. अश्या यांच्या कार्याची माहिती ओळख, वर्णन करण्यात आली.

## सणासुदीच्या काळात अतिक्रमण कारवाई स्थगित ठेवावी ;आझाद क्रांती सेनेची मागणी




केज दि ५ (प्रतिनिधी) - शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याची कारवाई तात्काळ थांबवून ती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नंतरच करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन आझाद क्रांती सेनेच्या वतीने आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख शरद थोरात तसेच तालुका उपप्रमुख अनिल लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. केज शहरातील अतिक्रमण धारकांमध्ये प्रामुख्याने गोरगरिब, अल्पसंख्याक व बहुजन समाजातील कुटुंबांचा समावेश असून त्यांची संपूर्ण उपजीविका याच छोट्या व्यवसायांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत रमजानचा पवित्र महिना, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, रमजान ईद आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या महत्त्वाच्या सणांच्या काळात अतिक्रमण कारवाई करणे म्हणजे सामान्य नागरिकांवर अन्यायकारक आघात ठरणार असल्याचे मत आझाद क्रांती सेनेने व्यक्त केले आहे. या काळात जबरदस्तीची कारवाई झाल्यास शहरात तणाव, असंतोष व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असेही निवेदनात नमूद केले आहे. तरी सर्वसामान्य नागरिकांचा विचार करता अतिक्रमण हटवण्याची कारवाई डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनंतरच करण्यात यावी, अन्यथा आझाद क्रांती सेना तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देईल, असेही या निवेदनातून स्पष्टकरण्यात आले. या निवेदनावर इरफान पठाण, लहू लक्ष्मण गिरी, बाबुराव गालफाडे, दगडू गालफाडे, विमल उत्तरेश्वर वैरागे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्कार्पिओसह १४ लाख रुपये किमतीचा बेकायदेशीर गुटखा जप्त

बीड दि ५(प्रतिनिधी) -गेली काही दिवसापासून बीड ग्रामीण पोलिसांनी गुटखा माफीयावर करडी नजर ठेवणे चालवले या पोलीस ठाण्याला पोलीस निरीक्षक मोदीराज आल्यापासून बीड ग्रामीण पोलीस सतत कारवाया करू लागले आहेत यातच डीवायएसपी पूजा पवार व पोलीस निरीक्षक मोदी राज यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने या ठाण्याच्या हद्दीमध्ये धुळे सोलापूर महामार्गावर महालक्ष्मी चौकात पोलिसांनी ४ फेब्रुवारी सकाळी ९ च्या सुमारास गुटख्याची वाहतूक करीत असलेली पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी पकडून गाडीचा सुमारे १३ लाख ७४ हजार १४० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य माल जप्त करण्यात आला.

बीडचे डी वाय एस प श्रीमती पूजा पवार यांच्या आदेशानुसार पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून पोलीस पथकाने एम एच-२३ जेस ५५२२ क्रमांकाची स्कॉर्पिओ गाडी थांबवताच एक संशयित इसम पळून गेला, तर बीड तालुक्यातील म्हाळस जवळा येथील चालक लक्ष्मण राधाकिसन खांडे याला पोलिसांनी ताब्यात घेतले. पंचांसमक्ष गाडीची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित हिरा पान



मसाला, केसरयुक्त विमल पान मसाला, रॉयल २२० टोबॅको, व्ही-१ तंबाखू मिळून आली. हा सर्व माल बेकायदेशीर विक्रीसाठी वाहतूक केला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस जमादार प्रसाद बाबासाहेब कदम यांच्या फिर्यादीवरून बीडग्रामीण पोलीस ठाण्यात गूरनं ४५/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वयेगुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, डीवायएसपी पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि काटकर, पोह प्रसाद कदम, पोअ सचिन आगलावे यांनी केली.

## डॉ.राजेंद्र ढाकणे व डॉ.विनिता ढाकणे यांना चंपावती भूषण पुरस्कार प्रदान



बीड दि.५(प्रतिनिधी)- वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बीड येथील प्रतिथयश स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र ढाकणे व डॉ.विनिता ढाकणे यांना अनिलदादा जगताप फोंडेशनच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा चंपावती भूषण पुरस्कार बुधवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

बीड जिल्ह्यात वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात मागील तीन दशका पासून कार्यरत असलेल्या डॉ. राजेंद्र ढाकणे व डॉ. सौ. विनिता ढाकणे या उभयत्यांनी लोकहितकारी, प्रेरणादायी कार्य केले आहे. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य सर्वश्रुत आहे. तसेच सावित्रीबाई फुले महिला शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून गुरुकुल शिक्षण समूहाद्वारे हजारो उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना देशाचा उत्तम नागरिक बनवले आहे. तर इंग्रजी माध्यमातून शिक्षण देवून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण पिढी घडवण्याचे कार्य डॉ. ढाकणे दाम्पत्याने मागील पंचवीस वर्षात केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन बुधवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गुरुकुल परिवारासाठी हा सुवर्णक्षण असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकट रमण यांच्या उपस्थितीत केजला शांतता कमिटीची बैठक संपन्न

केज दि ५ (प्रतिनिधी) शिवजयंती उत्सव २०२६ हा शांततेत, शिस्तबद्ध व सामाजिक सलोख्याच्या वातावरणात साजरा व्हावा, या उद्देशाने सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या प्रमुख उपस्थितीत केज पोलीस ठाणे येथे बुधवारी शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली.

या बैठकीत पोलीस प्रशासन, शिव जयंती उत्सव समित्या, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव व विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते.

या बैठकीस केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिवजयंती उत्सव हा केवळ उत्सव न राहता सामाजिक ऐक्याचा आदर्श ठरावा, असे आवाहन केले. यावेळी डी.जे.मुक्त शिवजयंती, सांस्कृतिक कलेला प्राधान्य आसा बैठकीत यंदाच्या शिव जयंती उत्सवात डीजे पूर्णतः बंद ठेवून पारंपरिक सांस्कृतिक कला पथकांना प्राधान्य दिले जाईल. यामुळे ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण मिळेल तसेच शिव जयंती चा सांस्कृतिक व ऐतिहासिक संदेशप्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. त्याचबरोबर महिलां साठी स्वतंत्र व सुरक्षित व्यवस्था निर्माण करून, महिला, वृद्ध, लहान मुले व ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी होतील, अशा सर्व समावेशक नियोजनावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.सामाजिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन यावेळी योगेश गायकवाड भाई मोहन गुंड, हनुमंत भोसले सर आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त करत उत्सव अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित व प्रेरणादायी कसा होईल, याबाबत मौलिक सूचना मांडल्या.

## राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत प्रांजलीची कामगिरी

केज दि ५(प्रतिनिधी) -नविदिल्ली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रीय बेसबॉल १९ वर्षांखालील मुली स्पर्धेत महाराष्ट्र संघाने आपल्या अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक पटकावले आहे. यात केज तालुक्यातील नागझरी गावची सुकन्या कु. प्रांजली चंद्रसेन मुद्रिका चौरे हिने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रांजली ही नागझरी गावच्या सरपंच सौ. मुद्रिका चंद्रसेन चौरे यांची कन्या आहे. ग्रामीण भागातील एका खेळाडूने राष्ट्रीय स्तरावर मजल मारून कांस्यपदक प्राप्त केल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.स्पर्धेचा देशभरा तील विविध राज्यांच्या तगड्या संघांना पराभूत करत महाराष्ट्र संघाने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली होती. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये प्रांजलीने बेसबॉल मधील दोन्ही आघाड्यांवर चमकदार कामगिरी केली. तिच्या या यशात तिचे प्रशिक्षक, आई-वडील आणि संघ सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. प्रांजलीच्या या यशाबद्दल केज तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून विजयी संघाचे आणि कु. प्रांजली मुद्रिका चंद्रसेन चौरे हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल आदित्य विद्यागर सत्कारित



बीड दि ५ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य शालेय राष्ट्रीय सॉफ्ट बॉल स्पर्धा नागपूर येथे दि., ३० जानेवारी २०२५ ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाली. या स्पर्धेत येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाचा विद्यार्थी आदित्य अरविंद विद्यागर याने सुवर्णपदक प्राप्त याबद्दल त्याचा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज यांच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड येथे भव्य सत्कार करण्यात आला.आदित्यचा सत्कार करताना,बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ॲड. उद्धवराव कराड सर, ढाकणे सर, काळे सर, होसुरकर सर,पाटील सर, रेवन्नाथ शेलार सर,करंडे सर, जाहेर सर, बाळू सर तसेच प्राचार्य डॉ. कविता कराड गित्ते उपस्थित होते.आदित्यला सानप सर, शेलार सर, राठोड सर, तरकसे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते.सर्वांनी सत्कार करून त्याच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## अंबाजोगाई ते सेलूअंबा जोडणारा रस्ता तात्काळ दुरूस्त करावा

### अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे निवेदन

अंबाजोगाई दि ५ (प्रतिनिधी) - तालुक्यातील लातूर जिल्ह्याकडे जाणारा अंबाजोगाई ते सेलूअंबा जोडणारा रस्ता तात्काळ दुरूस्त करा. अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी यांना मंगळवार, दि.३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून, अंबाजोगाई तालुक्यातील सेलूअंबा या गावी जाण्यासाठी जो पोखरी मार्गे रस्ता आहे. या रस्त्याला शहरी व ग्रामीण भागातील वाहतूक, वर्दळ खूप मोठ्या प्रमाणात आहे. सेलूआंबा, सायगाव, सुगाव, नांदगाव, बर्दापूर, चाडगाव, मोटेगाव, मुडेगाव तसेच लातूर जिल्ह्याकडे जाणारा व इतर अनेक गावांकरिता हा रस्ता अत्यंत उपयुक्त आहे. एक तर हा रस्ता सिंगल व अरूंद आहे. त्यात अनेक



ठिकाणी जागोजागी खड्डे व रस्ता पूर्णपणे नादुरूस्त झालेला आहे. त्यात खरोळा नदीच्या पुलापाशी तर रस्ता हा पूर्णपणे खचलेला आहे. साधी मोटरसायकल ही यावर दिवसा नीट जाऊ शकत नाही. तर चार चाकी वाहनाला मोठी कसरत करावी लागते. तेव्हा सदर रस्ता त्वरित दुरुस्त करावा अशी मागणी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

## कौशल्यविकास मंत्री ना.मंगलप्रभात लोढा यांची सिरसाळा कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट

परळी दि ५ (प्रतिनिधी)- राज्याचे कौशल्य विकास, रोजगार तथा उद्योजकता मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांनी बुधवार, दिनांक ४ रोजी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार तसेच सर्व कृषीकुल कृषी सेवकांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी ना.लोढा यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या संपूर्ण कामकाजाची माहिती घेऊन, शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त असे कामकाज होत असल्याबाबत कामाचे कौतुक केले.

ना लोढा हे बुधवारी पोहनेर येथे जोशी कुटुंबियांच्या सांत्वनासाठी आले होते. सांत्वन भेट झाल्यानंतर त्यांनी सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. यावेळी विविध जिल्ह्यांतून प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्याशी मराठवाड्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या भविष्यातील व्यावसायिक संधी याबद्दल विस्तृत चर्चा झाली. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण ग्लोबल विकास ट्रस्टकडून दिले जात आहे. जिव्हीटी चे काम शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल असे विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## जातेगाव गणात भाजपाकडून श्रध्दा मस्के प्रबळ दावेदार

जातेगाव दि ५ (प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील जातेगाव पंचायत समिती गणात सध्या दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी मोर्चे बांधणीला सुरवात केली असून भाजपाकडून श्रध्दा रामदास मस्के या उच्च शिक्षीत महिलाचे नाव आघाडीवर आहे.त्यांचे पती देखील उच्च शिक्षीत असुन जातेगाव पंचायत समिती गणात त्यांचा राजकीय दांडगा जनसंपर्क आहे.याच बळावर त्यांनी या गणात प्रचारात अधिक भर दिला आहे.

या गणातील प्रत्येक गावात जाऊन मतदारांच्या गाठी भेटीवर सध्या अधिक भर दिल्याचे दिसून येत आहे.रामदास मस्के यांचा दांडगा जनसंपर्क व त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे जातेगाव पंचायत समिती गणात भाजपाकडून श्रध्दा मस्के ह्या भाजपाकडून प्रबळ दावेदार असल्याचे मतदारांमधून बोलले जात आहे.दरम्यान जातेगाव गणात भाजपाकडून आम्ही पुर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असल्याचे युवानेते रामदास मस्के यांनी बोलताना सांगितले.या गणातील नागरिकांची शासकीय पातळीवरील कामे करुन त्यांच्या सुख दुःखात आजवर सहभागी होत आलो आहोत,त्यामुळे या गणातील मतदानरुपी मतदान करुन मतदार या गणातील आम्हाला विकास कामाची संधी देतील याचा पुर्ण विश्वास असल्याचे देखील रामदास मस्के यांनी सांगितले.तर श्रध्दा मस्के ह्या उच्च शिक्षीत महिला असुन त्यांचे पती देखील उच्च शिक्षीत आहेत.दोघेही उच्च शिक्षीत असल्याने शासकीय पातळीवर आपल्या गणातील विविध गावात विकास कामांच्या योजना आणण्यासाठी या शिक्षणांचा मोठा फायदा होईल असे मतदारांमधून बोलले जात आहे.

## वसीम बिल्डर मित्र मंडळ व मोगलपुरा यंग ग्रुपच्या वतीने नगरसेवक सन्मानित

जामखेड दि ५ (प्रतिनिधी)-- वसीम बिल्डर मित्र मंडळ व मोगल पुरा यंग ग्रुपच्या वतीने नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला त्यावेळी बोलताना सर्वाच्या सहकार्याने मुकुंदनगरचा विकास करून चेहरामोहरा बदलू तसेच शहरात कायमस्वरूपी हिंदू मुस्लिम ऐक्य आबादित ठेवणार याच बरोबर सामाजिक कामाला प्राधान्य देणार असल्याचे मत अहिल्यानगर महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक हाजी शहेबाज यांनी व्यक्त केले सर्व समाजघटकांना बरोबर घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला .

वसीम बिल्डर मित्र मंडळ व मोगलपुरा यंग ग्रुपच्या वतीने जामखेड येथे आहिल्यानगर महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक हाजी शहेबाज , खालीद शेख, माजी नगरसेवक समद खान, मुजीब शेख, मोहसीन शेख , शाकीर शेख, यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी वसीम बिल्डर, उमर कुरेशी, सज्जाद पठाण , ॲड . नाजीम पठाण, विकी



घायतडक, ताहेर खान, हानीफ कुरेशी, जाकीर काझी ,शाकीर खान, मोहसीन कुरेशी , वसीम सय्यद, जमीर शेख, अबरार सच्च , वसीम कुरेशी, गुलजार शेख, इम्रान शेख ,दानिश पठाण, , अरमान शेख, अलतमश शेख , उबेद शेख, तौफीक शेख , आबेद शेख, आदनान शेख , जिशान शेख, शहेबाज सय्यद , अशकान शेख, गालीब कुरेशी, कुरेशी, शकिल शेख, खिजर खान, अय्यास शेख, शकिल शेख, आवेज कुरेशी,सोहेल काझी, अय्यास शेख, समीर खान, मुख्तार सय्यद, इस्माईल सय्यद, परवेज खान, इमरान कुरेशी, नाजिम काझी, इस्माईल शेख, अर्शद शेख, झाहीर शेख, काझी यांच्या सह या कार्यक्रमाला शहरातील विविध वसीम बिल्डर मित्र मंडळ व मोगलपुरा यंग ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी माजी नगरसेवक समद खान यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, एकजुटीने काम केले तर नक्कीचं ते मोठे विकास काम होऊ शकते . सर्वांनी एकजुटीने राहून कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, या विचाराने नवनिर्वाचित नगरसेवक काम करतील अशा विश्वास व्यक्त केला . लवकरच जामखेड शहरात एम आय एम पक्षाची स्थापना करणार असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

तसेच जामखेड शहराच्या सामाजिक ऐक्यासाठी व जातीय सलोखा राखण्यासाठी वसीम बिल्डर मित्र मंडळ व मोगलपुरा यंग ग्रुपच्या सर्व कार्यकर्त्यांनी नेहमीच पुढाकार घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन माजी नगरसेवक समद खान यांनी व्यक्त केले .

## उद्या २ हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत होणार जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा-डॉ.साळुंके

बीड दि ५(प्रतिनिधी)- बीड जिल्हा इतिहास परीक्षेच्या परिषदेच्या वतीने आयोजित बीड जिल्हा इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा उद्या दि. ७ फेब्रुवारी रोजी संपन्न होत असून या परीक्षेत बीड तालुक्यातील २ हजार विद्यार्थी सहभागी होत असल्याची माहिती इतिहास परिषदेच्या वतीने देण्यात आली.

यासंबंधीत या परीक्षेत सहभागी शाळा याच परीक्षेचे केंद्र असणार असून सहभागी शाळांमध्येच या परीक्षा होणार आहेत. सहभागी सर्व परीक्षार्थींना गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची हे पुस्तक विनामूल्य देण्यात आले असून दोन हजार विद्यार्थी गेल्या काही दिवसांपासून या पुस्तकाचे वाचन करीत. आहेत बीड विषयी सर्वत्र नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत असताना हे पुस्तक नव्या पिढीला बीडचा वैभवशाली इतिहास सांगून आपल्या भूमीविषयी अभिमान बाळगण्याची प्रेरणा देईल अशी प्रतिक्रिया पुस्तकाचे लेखक व इतिहासकार डॉ सतीश साळुंके यांनी व्यक्त केली.अशा प्रकारचा इतिहासावरील उपक्रम महाराष्ट्रात केवळ बीड जिल्ह्यातच होत असून बीडच्या इतिहासावर जनतेचे असलेले प्रेम त्यातून व्यक्त झाले आहेत. प्रस्तुत पुस्तक अत्यंत नाविन्यपूर्ण लिहिले असून त्यात विविध १४ क्युआर कोडद्वारे जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्राचीन व मध्ययुगीन स्थळांचे व्हिडिओ आहेत. विशेष म्हणजे बीड जिल्ह्याच्या इतिहासाची साधने व बीड शहराच्या वेशी, तटबंदी किल्ला याच्या अत्यंत अभ्यासपूर्ण माहिती पुस्तकात व्हिडिओच्या माध्यमातून देण्यात आली. सदर पुस्तक प्रचंड आवडल्याची प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या परीक्षेसाठी बीड शहर व तालुक्यातील विविध शाळा व मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी केलेल्या सहकार्याबद्दल बीड जिल्हा इतिहास परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले.

# संपादकीय

## गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर – जयकिशन, मदन – मोहन, उषा खन्ना, कल्याणजी – आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत – प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून तलवाड्यात तरूणाने केली आत्महत्या ;दोन जणांना अटक



गेवराई दि. ५ (प्रतिनिधी) - तालुक्यातील मौजे तलवाडा येथील रामेश्वर ऊर्फ गोरख मोहन शिंगणे या तरूणाला जागेच्या वादातून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून या तरूणाने अंबिकानगर परिसरातील एका पुरातणकालीन विहीरीमध्ये (आड) आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मयत मुलाच्या आईच्या म्हणण्यानुसार शनिवार दि.३१ जानेवारी रोजी आरोपी लक्ष्मण बापूराव शिंगणे व सौ.मनिषा लक्ष्मण शिंगणे या दोघांनी मयत रामेश्वर ऊर्फ गोरख शिंगणे याला तुळजाभवानी देवीच्या परिसरात अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली असे तिच्या मुलाने मृत्यूपूर्वी सांगितले होते. शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास तो घरून बाहेर गेला व परत घरी आलाच नाही. त्यानंतर त्याच्या आईने त्याचा नातेवाईक व इतरत्र शोध घेतला. परंतु तो कुठेच आढळून न आल्याने त्याच्या आईने लक्ष्मण शिंगणे व मनिषा शिंगणे यांच्या त्रासाला कंटाळून माझा मुलगा गायब झाल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी देखील त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण तो मिळून आला नाही. मंगळवार दि.३ फेब्रुवारी रोजी त्याचे प्रेत अंबिकानगर परिसरातील एका आडामध्ये (पुरातणकालीन विहीर) तरंगताना आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून प्रेत बाहेर काढले. तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन केल्यानंतर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगळवारी रात्री उशिरा मयत मुलाची आई वंदना मोहन शिंगणे यांच्या फिर्यादीवरून आरोपी लक्ष्मण बापूराव शिंगणे व सौ.मनिषा लक्ष्मण शिंगणे या दोघा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, कलम १०८, ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा अटक केली आहे. वरील आरोपींनी यापूर्वी देखील मयत रामेश्वर ऊर्फ गोरख मोहन शिंगणे व श्रीमती वंदना मोहन शिंगणे यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती असे वंदना शिंगणे यांनी तलवाडा पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे तलवाडा व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आडोळा येथे उद्या अखंड हरिनाम सप्ताह श्रीकृष्ण कथा ज्ञानयज्ञ कीर्तन महोत्सवाची सांगता

माजलगाव दि.५(प्रतिनिधी) -तालुक्यातील गोदावरी नदीच्या किनाऱ्यावरील आडोळा येथे अखंड हरिनाम सप्ताह श्रीकृष्ण कथा ज्ञान यज्ञ आणि भव्य कीर्तन महोत्सव सुरू असल्याने आढळते पंढरी अवतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे या सप्ताहाची उद्या दिनांक सात फेब्रुवारी रोजी सांगता होत आहे भाविक भक्तांनी महाप्रसादाचा व किर्तन रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी गोदावरी नदी काठावर असलेल्या आढळते हनुमान मंदिराच्या प्रांगणामध्ये दिनांक ३१ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताह श्रीकृष्ण कथा ज्ञानयज्ञ कथा प्रवक्ते कथा प्रवक्ते दिलीप महाराज पवार यांच्या अमृतवाणीतून संपन्न होत आहे आणि भव्य कीर्तन महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू झाला असून या सप्ताहामध्ये दररोज पहाटे चार ते सहा काकडा भजन सहा ते नऊ ज्ञानेश्वरी पारायण दहा ते बारा राम कृष्ण हरी जप दुपारी एक ते चार पर्यंत श्रीकृष्ण कथा सहा ते सात हरिपाठ रात्री नऊ ते ११ हरिकीर्तन नंतर हरिजागर होत आहे या सप्ताह मध्ये दि. ३१ जानेवारी रोजी ह भ प बळीराम महाराज शिंदे, दि.१ फेब्रुवारी रोजी प.प.श्री. श्री. श्री. १००८ महंत पद्मनाभानंद गिरी,दि. २ फेब्रुवारी रोजी ह भ प विनोदाचार्य मुकुंद महाराज गात,दि. ३ फेब्रुवारी रोजी ह भ प कविराज महाराज झावरे, दि.४ फेब्रुवारी रोजी हभप किर्तन केसरी अक्रूर महाराज साखरे, दि. ५ फेब्रुवारी रोजी हभप वेदांताचार्य विष्णू जगताप, दि ६ फेब्रुवारी रोजी ह भ प आचार्य १००८ भगवंत महाराज पुरी, आणि उद्या दि. ७ फेब्रुवारी रोजी ह भ प गाथा मूर्ती उमेश महाराज दशरथे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील दिग्गज नामवंत मृदंग महामेरू रामभाऊ काजळे माधव राज नरोडे, कृष्णा बोरखडे भरत पठाडे माधव सोळंके विठ्ठल जमदाडे चंद्रकांत पांचाळ रोहन भिसे विष्णू रेंगे यांच्या सोबतच भजन सम्राट अभिमन्यू आबा पांचाळ उद्धव बापू शिंदे पंढरीनाथ कदम कैलास पवार पांडुरंग गोळेगावकर अविनाश जाधव किशोर दिवटे नारायण आर्दड स्वप्निल तायडे विशाल जाधव अमोल जाधव सागर पवार अशोक ढगे आदी गुणवान मंडळी उपस्थित राहणार आहेत या सर्व कार्यक्रमामुळे आडोळा येथे पंढरी अवतरल्याचे चित्र दिसत आहे तरी भाविक भक्तांनी महाप्रसादाचा व किर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा असे आव्हान आडोळा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

# कवी इंद्रजीत भालेराव यांच्या उपस्थितीत होणार श्री बंकटस्वामी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन

बीड दि ५ (प्रतिनिधी)- -येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी, विचारवंत व साहित्यिक इंद्रजीत भालेराव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.इंद्रजीत भालेराव हे समकालीन मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाचे नाव असून, त्यांच्या कवितांमधून सामाजिक वास्तव, ग्रामीण जीवन, श्रमिकांचे प्रश्न, मानवी संवेदना व परिवर्तनाची आस प्रभावीपणे व्यक्त होते.



या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने गुरुवार, दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्नेहसंमेलन व सांस्कृतिक स्पर्धांमुळे महाविद्यालयीन वातावरणात उत्साह, सर्जनशीलता व सांस्कृतिक चेतना निर्माण होणार आहे. या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे यांनी केले आहे.

# माता रमाई गणगोत पुरस्काराचे उद्या वितरण

नांदेड दि ५(प्रतिनिधी)- जिल्ह्यातील दक्षिण अंतर्गत माता रमाई विचार मंच, जवळा व माता रमाई जयंती मंडळ, जवळा यांच्या वतीने दिले जाणारे यंदाचे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये पूज्य भंते बौद्धीधम्मो यांची आई आयु. सरस्वतीबाई लक्ष्मणराव पोवळे (वसरणी, नांदेड), ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांची आई आयु.निर्मलाबाई त्र्यंबक कांबळे (कंधार), आयु.सुनिता नागोराव डोंगरे (उमरी), सुकांता शंकरराव वाघरे, समता सैनिक आयु.दैवशाला गणेश मस्के (माळाकोळी), आयु.लक्ष्मीबाई किशन जमराज (पिंपरण), आयु. जिजाबाई विठ्ठल गोडबोले (बळीरामपूर, नांदेड) मातांचा समावेश आहे. दरवर्षी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंती निमित्ताने ७ फेब्रुवारी या दिवसाचं औचित्य साधून ७ मातांचा सन्मान गौरव जवळा ता.लोहा येथील माता रमाई विचारमंच व रमाई जयंती मंडळाच्या वतीने करण्यात येत असतो. त्यामध्ये भंतेजीची माता, पत्रकारांची माता, सैनिक माता, मुलं घडविलेल्या माता, अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान मातांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, मेडल, शाल, पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येत असतो. अतिशय आगळावेगळा हा सन्मान सोहळा जवळा (दे) ता.लोहा येथील त्यागमूर्ती माता रमाई जयंती निमित्त दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी विश्वशांती बुद्ध विहार, जवळा या ठिकाणी अतिशय थाटामध्ये पार पडणार आहे. अशी माहिती रमाई विचार मंचाचे आयु.आनंद पुरभाजी गोडबोले (भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव, नांदेड तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक नांदेड व जयंती मंडळाच्या अध्यक्षा आयु. भारतबाई विठ्ठल निखाते यांनी दिली.

# आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केली सायबर गुन्ह्याची जनजागृती

माजलगाव दि.५(प्रतिनिधी):- राजस्थानी विद्यालयात दि.३ व ४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६ बाल महोत्सव अत्यंत आनंदोत्सवामध्ये पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी नाटिकेतून सायबर गुन्ह्याची जनजागृती केली.यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमाचे खूप महत्त्वाचे स्थान आहे, असे सांगितले तसेच आपल्या भाषणातून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त, आत्मविश्वासाचे कौतुक केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. लेझीम मनोरे, शिव तांडव,देशभक्तीपर गीत, लावणी, गोंधळ, पोवाडा यांचे सादरीकरण झाले. आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केशव बादाडे सरांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या नाटिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या जनजागृतीपर नाटिकेतून ऑनलाइन गेम,ऑनलाइन रमी, ऑनलाइन कर्ज देणारी प, माहिती व डेटाबेस चोरी, सायबर गुन्हेगारी, फसवे फोन कॉल, सायबर गुन्ह्याची माहिती व जनजागृती केली.




तसेच आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी गीतांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख, देशभक्ती प्रेम, मराठी शाळा वाचवा अशा विविध भूमिकातून विद्यार्थ्यांनी आपले कला अविष्कार सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षका कडून उत्स्फूर्त टाळ्यांनी दाद दिली. या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी डॉ. आर.जी. बजाज, उद्घाटक डॉ.सुरेश साबळे, प्रमुख उपस्थिती ग्रामीण कथाकार रामदीप डाके, सय्यद रफिक, प्रमुख उपस्थिती सौ.सोनाली अनभुले, रामानंद लड्डा, ओमप्रकाश मानधने, प्रमुख पाहुणे सौ. सुलोचना प्रधान, सौ. संगीता झंवर , चंद्रशेखर हाडूळे, मार्गदर्शन मुख्याध्यापक माध्यमिक चंद्रशेखर तौर, प्राथमिक सारिका तौर, स्नेहसंमेलन प्रमुख पांडुरंग होके, नागकन्या घुसे, रेणुका जोशी हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या क्रीडा संघात आदित्य कृषी महाविद्यालयाचा डंका




बीड दि.५ (प्रतिनिधी)- शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा क्षेत्रात आपला कायम दबदबा निर्माण करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या संघात पाच विद्यार्थ्यांची निवड घडवून आणत आपली गुणवत्ता अधोरेखित केली आहे. सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळे आदित्यचा डंका विद्यापीठ स्तरावरही घुमत आहे. विद्यापीठ स्तरावरील खो-खो आणि कबड्डी या प्रमुख खेळांच्या संघांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. खो-खो संघात तीन तर कबड्डी संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.या निवडीबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे अभिनंदन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कबड्डी संघासाठी कुंभार सुगंधा व खेडकर मनीषा तर खो-खो संघात शेंडे सौरव, श्रीराम सानिका आणि वाघमारे शैलजा यांना संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन, क्रीडा शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत महत्त्वाची ठरली आहे. आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदिती सारडा विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना म्हणाल्या की विद्यार्थ्यांची निवड ही केवळ खेळातील कौशल्यावर आधारित नसून त्यांच्या शिस्त, सांघिक भावना आणि धैर्य या गुणांमुळे झाली आहे. महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्व खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून आगामी आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. हे खेळाडू विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात समूपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचा समारोप

बीड दि ५ (प्रतिनिधी)- येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने चार व पाच फेब्रुवारी रोजी आयोजित दोन दिवसीय समूपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचा यशस्वी समारोप दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे यांची प्रमुख उपस्थिती होती, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांनी भूषविले.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर डॉ.एन.डी. राऊत (आयसीटीसी, जिल्हा रुग्णालय, बीड) यांनी तसेच लेखन कौशल्य या विषयावर डॉ. रामचंद्र गिराम यांचे वाणिज्य क्षेत्रातील विविध करिअर संधी या विषयावर डॉ.जयद्रथ मगर यांचे , बाळू कोटेचे यांनी यशस्वी उद्योजक या विषयावर मार्गदर्शन केले समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ.शंकर धांडे यांनी या कार्यशाळेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे मत व्यक्त केले. यावेळी काही विद्यार्थ्यांनीही कार्यशाळेबाबत आपली मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांनी केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील त्रिभुवन यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.मनोजकुमार नवसे यांनी मानले.

# गेवराईत भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

गेवराई दि.५ (प्रतिनिधी) विश्वकर्मा सुतार समाज मंदिर गेवराई याठिकाणी विश्वकर्मा जयंती विश्वकर्मा प्रतिमा व कलश पूजन करण्यात आले. गेवराई येथील विश्वकर्मा पांचाळ - सुतार समाजाच्या वतीने भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विश्वकर्मा मंदिरात जयंती सोहळ्यानिमित्त पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच आरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना हभप मसानानाथ महाराज म्हणाले की जीवनात सुखी असताना भगवंतांचे नामस्मरण केले पाहिजे. यामुळे दु:खाच्या प्रसंगात तग धरता येते. नामस्मरणात असलेली ताकद ओळखली की, सर्व चिंतांचा विसर पडतो, भगवंताशी एकरूप होता येते असेही त्यांनी सांगितले. यावेळी युवानेते रणवीर काका पंडित, माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे, नगरसेवक खाजा मामू, नगरसेवक शाहरुख पठाण, विश्वकर्मा वंशिय समाज संघटना तालुकाध्यक्ष अशोक नाना गायकवाड तसेच विश्वकर्मा प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिनाथ सांगुळे, उपाध्यक्ष भास्कर गायकवाड, विष्णू सावंत, अंकुश पांचाळ, राजेंद्र काळे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बुद्धी सागर सावंत, उपाध्यक्ष निलेश गायकवाड, बबनराव सोनवणे, अशोकराव सोनवणे, सचिव बाबासाहेब सांगुळे, अभिषेक गायकवाड, रोहित गायकवाड, मुन्ना गायकवाड, बाळू गायकवाड, रवी गायकवाड, सुभाष घुंबार्डे आदीजण उपस्थित होते.

# 'सायरन वाजला की अभ्यास सुरू' या उपक्रमाचे चव्हाणवाडी गावात उद्घाटन




गेवराई दि.५ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील मौजे चव्हाणवाडी या गावात रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी सायरन वाजला की अभ्यास सुरू या अभिनव व समाजोपयोगी शैक्षणिक उपक्रमाचे उद्घाटन भाऊसाहेब लक्ष्मणराव शेळके यांच्या हस्ते व शेख अहमद सर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विनोद यादव सर यांनी केले. यावेळी प्रा.रावसाहेब शेळके, प्रा.कृष्णा यादव, महावितरण अधिकारी सुनील सुळे, रावसाहेब चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच अध्यक्ष शेख अहमद सर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, सातत्य, वेळेचे नियोजन आणि नियमित अभ्यासाचे महत्त्व याबाबत सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. उद्घाटक भाऊसाहेब शेळके सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर केले. सायरन वाजला की अभ्यास सुरू हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नियमितपणा, जबाबदारी व वेळेचे भान निर्माण करेल असेही ते म्हणाले. या कार्यक्रमास राजेंद्र पिंपळे सर, प्रा.सूरज शेळके सर, एअरमॅन प्रसाद चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमांतर्गत दररोज सायंकाळी ७ वाजता गावात सायरन वाजवण्यात येणार असून, त्या सायरननंतर सर्व विद्यार्थ्यांनी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत सक्तीने अभ्यास करावा व पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर लक्ष ठेवावे असे नमूद करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल बिंगले यांनी केले. या कार्यक्रमास गावातील विद्यार्थी, पालक, माता - भगिनी, शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# महिला महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

गेवराई दि.५ (प्रतिनिधी) :- जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय गेवराई ची शैक्षणिक सहल मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या शैक्षणिक सहलीमध्ये देवगिरी किल्ला, वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिर या स्थळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी देवगिरी किल्यावरील ऐतिहासिक वास्तूची माहिती घेण्यात आली. वेरूळ येथील कैलास मंदिर लेणी, विश्वकर्मा लेणी, दशावतार लेणी, इंद्रसभा लेणी इत्यादी लेण्यांना भेट देऊन त्यांची ऐतिहासिक माहिती समजावून घेतली. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असे वेरुळ येथील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन सहल संपन्न झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहल समिती प्रमुख प्रा.डॉ. रामहरी काकडे, प्रा.डॉ.दत्ता तंगलवाड यांनी या सहलीचे आयोजन केले होते. या सहलीमध्ये हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.संगीता आहेर, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कैलास सावंत, प्रा.डॉ.राजाभाऊ चव्हाण, प्रा.बाबू वादे हे सहभागी झाले होते. या सहलीमध्ये ऐतिहासिक अशी माहिती मिळाली. किल्ले भ्रमंतीमुळे शारीरिक आरोग्याचे महत्त्व समजले अशा प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थीनींनी दिल्या.



गेवराई - मुकनायक व दर्पण दिनानिमित्त महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ.दत्तात्रय नवनाथ गुंजाळ यांना जिल्हास्तरीय आरोग्य सेवारत्न पुरस्कार देऊन सपत्नीक गौरव करताना.

## भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम ११ नुसार अधिसुचना

क्र.२०२६/एलएनक्यु/एसआर/०३/२०२५
उपविभागीय अधिकारी, बीड
दिनांक : २३/०१/२०२६

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसुचना क्र.मिस/११/२०१४/सीआर/७७/अ२ दिनांक : १९ जानेवारी २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ३ पोटकलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन असे अधिसुचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ (झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत ५०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सदर जिल्हयाचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, बीड हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमुद जगिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासु शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आधात निर्धारणायावतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा येळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/ हस्तांतर नाही किंया कोणताही व्यबहार/हस्तांतर करविणार नाही किवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीधी किंया क्षतीधी जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकल (५) व भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना याजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे भुमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल. आणि ज्या अर्थी, सदर कायद्यांचे कलम ३ उपकलम ग) अन्वये जिल्हाधिकारी, बीड हे समुचित शासन असल्याने उपविभागीय अधिकारी, बीड तथा भूसंपादन अधिकारी, बीड यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

### परिशिष्ट १ जमिनीचे वर्णन

**गावाचे नांव : सिंदफणा मध्यम प्रकल्प उंची वाढ मौजे मदमापुरी ता. शिरुर का. जिल्हाः बीड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | २ | ०.६८ |
| २ | ४ | ३.८७ |
| ३ | ४५ | ०.१९ |
| ४ | ४४ | १.५२ |
| ५ | ४३ | १.२३ |
| ६ | ४२ | ०.८८ |
| ७ | १५ | २.२२ |
| ८ | १४ | २.२७ |
| ९ | १२ | १.०६ |
| १० | ११ | ३.५८ |
| ११ | १० | १.७८ |
| १२ | ३८ | ०.११ |
| १३ | १६ | ०.२७ |
| | | **एकूण १९ हेक्टर ६६ आर** |

### परिशिष्ट २

**प्रकल्पाचे नांव : सिंदफणा मध्यम प्रकल्प उंची वाढ मौजे मदमापुरी ता. शिरुर का. जि.: बीड**
**प्रकल्पाचे विवरण:** सिंदफणा मध्यम प्रकल्प उंची वाढ मौजे मदभापुरी ता. शिरुर का. जि.: बीड **सामाजिक फायदे :** जलसंधारण (आर्थिक, रोजगार व इतर फायदे)

### परिशिष्ट ३

पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण

**गावाचे नांव :– सिंदफणा मध्यम प्रकल्प उंची वाढ मौजे मदमापुरी ता.शिरुर का. जि.: बीड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| | **लागू नाही** | |

### परिशिष्ट ४

**अनुसूची– चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ–२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

टिप : उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

### परिशिष्ट ५

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

१) प्रशासकाचे पदनाम : लागू नाही
२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता : लागू नाही
३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमुद करावे : लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी बीड यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांक : २३/०१/२०२६
ठिकाण :– बीड

**(श्रीमती कविता जाधव)**
उपविभागीय अधिकारी, बीड.

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/२४२**

# घरकुल धारकांनो चिंता नको ; शासन मोफत वाळू वाटत आहे

## खांडे पारगाव येथे टुकूर नदीत तहसीलदार शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण

**बीड दि.५ (प्रतिनिधी): घरकुल उभं राहावं, भिंतींना आधार मिळावा , गरीबांच्या घरावर वाळूचा भार न पडावा या भावनेतून राज्य शासनाने राबविलेली मोफत वाळू वितरणाची योजना बीड जिल्ह्यात प्रभावीपणे आकार घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे . राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची अंमलबजावणी बीड जिल्ह्यात काटेकोरपणे सुरू असून, ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना थेट दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्याचे दिसून येत आहे.**



छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे वेळोवेळी विभागस्तरावर आढावा घेत मार्गदर्शन करत असून, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधून वाळू उपलब्धता, प्रस्ताव व वितरण याबाबत समन्वय साधला आहे.

बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३५३ लाभार्थी उद्दिष्ट असून त्यापैकी २३ हजार ३८६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या सुमारे ७ हजार १०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू ही अत्यावश्यक बाब असल्याने मोफत वाळू वितरण योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

बीड तालुक्यात दहा वाळू घाट निश्चित - बीड तालुक्यासाठी दहा वाळू घाट निश्चित करण्यात आले असून सिंधफणा नदीपात्रातील विविध ठिकाणी हे घाट आहेत. रंजेगाव, रामगाव, बऱ्हाणपूर, आडगाव, कुक्कडगाव, खुंड्रस , साक्षाळ पिंपरी आदी ठिकाणी वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय अंधापुरी, पिंपळादेवी, नागापूर बु., खांडे पारगाव , पारगाव सिरस या गावांमध्ये नव्याने नोंदणी केलेले प्लॉट असून येथून वाळू उपलब्ध करून देण्यात येत आहे .

खांडे पारगाव येथे प्रत्यक्ष वितरण - या पार्श्वभूमीवर बुधवार दि.४फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील अथरवन पिंपरी जवळील टुकूर नदीपात्रात खांडे पारगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण करण्यात आले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली.

या वेळी घरकुल लाभार्थी मधुकर तुकाराम सपकाळ व विकास बाबुराव आमटे यांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत मोफत वाळू वाटप करण्यात आले. २५ पैकी १२ लाभार्थ्यांना वाळू वाटप पूर्ण - याबाबत माहिती देताना ग्राम महसूल अधिकारी अक्षय ढोपे यांनी सांगितले की, आतापर्यंत एकूण २५ घरकुल लाभार्थ्यांपैकी १२ लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांनाही टप्प्याटप्प्याने वाळू दिली जाणार आहे . सध्या सुमारे ६०० ब्रास वाळूचे वितरण होणार असून, ज्या ठिकाणी वाळू उपलब्ध आहे तेथील प्रस्ताव तात्काळ दाखल करण्याच्या सूचना ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांचा सहभाग - या वेळी खांडे पारगाव गावचे उपसरपंच अनील आबा आमटे , दत्ता सुरवसे, नवनाथ बापू सपकाळ, रवींद्र सपकाळ तसेच अथरवन पिंपरी येथील उपसरपंच अशोक शिंदे, प्रवीण शिंदे, अमोल शिंदे यांच्यासह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून प्रशासनास सहकार्य करत हा उपक्रम यशस्वी केला. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हणाले, बीड तालुक्यातील लहान नद्या, ओढे, नाले यामध्ये नैसर्गिकरित्या साठणारी वाळू शासन धोरणानुसार घरकुलधारकांना मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाळू उपसा थांबेल आणि गरजू नागरिकांना थेट लाभ मिळेल.

घरकुलासाठी वाळू मिळवणे आमच्यासाठी मोठी अडचण होती. प्रशासनाने थेट नदीपात्रातून वाळू उपलब्ध करून दिल्यामुळे आमचा खर्च वाचला, अशी प्रतिक्रिया एका लाभार्थ्याने व्यक्त केली. गावकऱ्यांनी प्रशासन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले.

ग्रामीण घरकुलांसाठी दिलासादायक उपक्रम - एकीकडे अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई आणि दुसरीकडे शासन निर्णयानुसार पारदर्शक पद्धतीने मोफत वाळू वाटप या दोन्ही बाबींचा समतोल राखत बीड जिल्ह्यात प्रशासन काम करत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे. घर बांधणं स्वप्न नाही , योग्य हात मिळाले तर सत्य होतं.

ग्रामीण भागातील घरकुलधारकांसाठी हा उपक्रम निश्चितच दिलासादायक ठरणार असून, पुढील काळातही शासन धोरणानुसार अशीच कार्यवाही सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# घाटशिळा विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा विकास!

## शाळा संस्काराच्या केंद्र असतात–तहसीलदार सुरेश घोळवे



शिरूर कासार दि.५ (प्रतिनिधी)- बलशाली, सक्षम, राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका मौलिक असते. आजचे बालक, युवक, विद्यार्थी हे भविष्यातील राष्ट्राचे नागरिक असून त्यांच्या माध्यमातूनच राष्ट्राचे भविष्य घडते! असे सांगत शाळा या संस्काराच्या केंद्र असतात असे प्रतिपादन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले; तर संत भगवान बाबा आणि संत वामन भाऊंच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही घाटशिळ पारगाव ची भूमी असल्याचे भावोद्गार सहकार व शिक्षण महर्षी रामकृष्ण बांगर यांनी काढले. घाटशिळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या स्नेहसंमेलन तथा विविध गुण दर्शनाच्या भव्य व्यासपीठावर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रामकृष्ण बांगर होते. प्रारंभी संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर सरपंच सौ. मीरा नवनाथ खेडकर, उपसरपंच उषाताई राजेंद्र खेडकर, केंद्रप्रमुख का. भा. खेडकर, माजी सरपंच वैजनाथ खेडकर, माजी सरपंच कालीदास खेडकर, मुख्याध्यापक सदाशिव खेडकर, टेक महिंद्रा पुणे चे सतीश खेडकर, रामदास मेजर, नारायण घोडके मेजर, माजी पं.स.सदस्य राजेंद्र खेडकर आदी सह मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी श्री गणेशाला वंदन करून महाराष्ट्र गीतापासून अत्यंत उत्स्फूर्तपणे ताल,सुर आणि नृत्यावर गीते सादर केली. उपस्थित रसिक-श्रोत्यांनी प्रचंड टाळ्यांच्या गजरामध्ये युवा कलावंतांना प्रतिसाद दिला. देश रंगीला, खंडेराया झाली माझी दैना, मुंडे साहेबांची तलवार, दिंडी आणि कीर्तन, आया रे तुफान, शिवगर्जना, स्त्रीभ्रूण हत्या, चला जेजुरीला जाऊ, लाल दिव्याच्या गाडीला, पिचली माझी बांगडी, दैवत छत्रपती, सावित्रीबाई फुले नाटिका.. असे एकापेक्षा एक गीते सादर करून अध्यात्म राष्ट्रभक्ती आणि समाज परिवर्तनाची नवी चेतना या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून देण्यात आली. गावकऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद देत चिमुकल्यासह शिक्षकांच्या कौतुक करत रोख बक्षिसांची शाब्बासकी दिली. या सर्व विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रगती शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. सत्यभामाताई बांगर, विजयसिंह बांगर, मुख्याध्यापक गोपाळघरे, मुख्याध्यापक दिलीप कंठाळे, अशोक साहेब खेडकर, डॉ.तुकाराम नेहरकर, डॉ. बबन नेहरकर, अंकुश खेडकर, संतोष घोडके यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक एस. सी. वारभुवन, एस.एम. चोले, सी.एम.शिरसाट, प्रा.बटूळे, प्रा.बी.के. मुंडे, डी.एस. तळेकर, अशोक सांगळे, परजणे सर, आर. के. खेडकर, कोकाटे सर, गोरख बांगर, हंगे, पाखरे आदी सह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रगटन
**(वारस प्रमाणपत्रा बद्दल )**

**मा.श्री.आर.बी.पोळ सह ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माजलगांव जिल्हा बीड, यांचे न्यायालयात**
(मार्फत विधिज्ञ : ॲड.घायतिडक एच.एम.)
कि. दि. अर्ज नंबर ३७३/२०२५ राहुल वि. निरंक

ज्यापेक्षा **विरजसिंग किसणसिंग राजपूत** रा.गौतम हाऊसिंग सोसायटी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापूर ह.मु.भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड हे दि. १५/०१/२०२५ रोजी मयत झाले आहेत

**अर्जदार :** १) राहुल पि.धिरजसिंग राजपूत, वयः ५१ वर्षे, धंदाः नौकरी, रा. भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड.

२) लता भ्र. धिरजसिंग राजपूत, वयः ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गौतम हाऊसिंग सोसायटी कोल्हापुर ता. जि. कोल्हापूर

**इतर वारस : कोणी नाही.**

यांनी या न्यायालयात मयताचे कायदेशिर वारस आहोत असे घोषीत करून वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

ज्यापेक्षा अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशिर वारस नाहीत असे कोणास न्यायालयाला समजावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात स्वतः हजर राहुन हरकत दाखवावी सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरिल अर्जदारांनी त्यांच्या हक्का बद्दल पुरावा दिल्यास व तो न्यायालयास योग्य वाटल्यास त्यांना नयताचे कायदेशिर वारस आहेत असे घोषीत करून त्यांना मयताचे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल.

**प्रमाणपत्र आवश्यकता : अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन अर्जदारास अर्जदारास शासकीय कामासाठी व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.**

आज दि. २०/०५/२०२५ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्यांनिशी दिले.

**कोर्टाची पुढील ता.१७/०६/२०२५**

आदेशावरून,
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव

# आरोग्य जनजागृतीद्वारे कॅन्सरवर नियंत्रण शक्य – डॉ.अक्षय कांबळे



बीड (प्रतिनिधी) - बदलती जीवनशैली, अयोग्य आहार पद्धती, वाढती व्यसनाधीनता आणि शारीरिक कष्टाचा अभाव यामुळे समाजात कॅन्सरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या जीवघेण्या आजारापासून दूर राहायचे असेल तर नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ.अक्षय कांबळे यांनी केले.

जागतिक कॅन्सर दिनानिमित्त बीड येथील तुलसी व माता रमाई नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजित विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल उपस्थित होते. डॉ.अक्षय कांबळे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याबाबत जागरूकतेचा महत्त्वपूर्ण संदेश देत बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या कॅन्सरच्या धोक्याबाबत सावध केले. नियमित व्यायाम, संतुलित आहार, व्यसनमुक्त जीवनशैली आणि वेळोवेळी वैद्यकीय तपासणी ही कॅन्सर प्रतिबंधासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आजाराचे निदान सुरुवातीच्या टप्प्यात झाल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल यांनी आरोग्य शिक्षणात नर्सिंग विद्यार्थ्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. समाजामध्ये जनजागृती करून निरोगी समाज घडविण्यात या विद्यार्थ्यांचे योगदान मोलाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डी.डी.राऊत यांनी विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले ज्ञान समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागप्रमुख प्रा.अब्रार पठाण यांनी केले, तर आभार प्रा.इनामदार सोहेल यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै.पार्श्वभूमी,बीड — Date- 06/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAIKHANJUM MOHD NISAR**

**New Name : ANJUM UBED PATHAN**

- Address -
At Post Fhule Nagar Majalgaon Manjlegaon Dist.Beed Maharashtra 431131

दै.पार्श्वभूमी,बीड — Date- 06/02/2026

**DECLARATION**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME/SURNAME

**OLD NAME - ABUDBIN SALAM BINSHAMLAN**

**New Name : ABUD BIN SALAM CHAUS**

Address : Harshi Bk., Po: Harshi, Dist. Aurangabad, Maharashtra - 431107
Mobile: 9049098873

# गेवराईत भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

गेवराई दि.४ (प्रतिनिधी) :- विश्वकर्मा सुतार समाज मंदिर गेवराई याठिकाणी विश्वकर्मा जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विश्वकर्मा प्रतिमा व कलश पूजन करण्यात आले. गेवराई येथील विश्वकर्मा पांचाळ - सुतार समाजाच्या वतीने भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विश्वकर्मा मंदिरात जयंती सोहळ्यानिमित्त पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच आरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी युवानेते रणवीर काका पंडित, माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे, नगरसेवक खाजा मामू, नगरसेवक शाहरुख पठाण, विश्वकर्मा वंशिय समाज संघटना तालुकाध्यक्ष अशोक नाना गायकवाड तसेच विश्वकर्मा प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिनाथ सांगुळे, उपाध्यक्ष भास्कर गायकवाड, अशोकराव सोनवणे, सचिव बाबासाहेब सांगुळे, अभिषेक गायकवाड, रोहित गायकवाड, मुन्ना गायकवाड, बाळू गायकवाड, रवी गायकवाड, सुभाष घुंबार्डे आदीजण उपस्थित होते.

## महादेवी जंपलवार यांचे निधन



कडा ( प्रतिनिधी) - आष्टी शहरातील राम मंदिर परिसरातील रहिवासी महादेवी मारुतीराव जंपलवार वय ७४ यांचे गुरूवार दि ५ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता त्यांचे निधन झाले असून त्यांचा पार्थिवावर सायंकाळी ६.३० वाजता शेकापूर रोडवरील खंडोबा मंदिर परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्या संतोष जंपलवार, राजू जंपलवार, दत्तात्रय जंपलवार, चंद्रकांत जंपलवार यांच्या मातोश्री होत्या.तर अंत्यसंस्कार वेळी राजकीय, महसूलचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक, पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.


# पार्श्वभूमी

दि.०६ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार




## यश ढाका हत्या प्रकरणातील आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला

बीड दि ५ (प्रतिनिधी)-बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात यश देवेंद्र ढाका या तरुणाचा चाकूने भोकसून खून करण्यात आला होता,या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. हत्या प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपींपैकी तिघांचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. या निर्णयामुळे प्रकरणाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे.या गुन्ह्यात सोमनाथ उर्फ चिकू भाऊसाहेब काटे, निखील राजेंद्र घोडके,

पान २ वर

# पाटोदा पंचायत समितीमध्ये घरकुलाच्या पैशासाठी संतप्त लाभार्थ्यांचा राडा

पाटोदा दि ५ (प्रतिनिधी)–गोरगरिबांचे हक्काचे घर तर साकारण्यासाठी असलेल्या 'पंतप्रधान' आवास योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचे चित्र पाटोदा पंचायत समितीमध्ये पाहायला मिळत आहे. घरकुल योजनेचा पुढील हप्ता देण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून उघडपणे पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप करत, गुरुवारी बाजार दिवशी संतप्त लाभार्थ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयातच चांगलेच धारेवर धरले. यामुळे परिसरात या संदर्भात एकच चर्चा होताना दिसत होती.काही लाभार्थ्यांच्या तर्फे मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील अनेक लाभार्थी गेल्या काही दिवसांपासून घरकुलाच्या हप्त्यासाठी पंचायत समितीच्या चकरा मारत आहेत. घरकुलाचे काम विहित टप्प्यात पूर्ण होऊनही केवळ 'फाईल पुढे सरकवण्यासाठी' काही कर्मचाऱ्यांकडून ठराविक रकमेची मागणी केली जात असल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे. पैसे दिले तरच हप्ता जमा



होईल, अशा शब्दांत अडवणूक केल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला.. गुरुवारी बाजार दिवशी काही लाभार्थ्यांनी थेट संबंधित कक्षात जाऊन कर्मचाऱ्यांना जाब विचारला. आम्ही गरिबांनी पैसे आणायचे कुठून? सरकार पैसे देते तर तुम्ही का अडवता? अशा शब्दांत लाभार्थ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले. यावेळी कर्मचाऱ्यांची बोलती बंद झाली होती.पाटोदा पंचायत समितीमध्ये घरकुल योजनेच्या हप्त्यासाठी ठराविक टक्केवारी ठरलेली असल्याची चर्चा आता उघडपणे होत आहे. हप्ते वेळेवर न मिळाल्याने अनेकांच्या घरांची कामे अर्धवट अवस्थेत पडली असून,यामुळे साहित्याचे नुकसान होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.गोरगरिबांच्या हक्काच्या पैशात वाटा मागणं लाजीरवाणं आहे. जर ही अडवणूक थांबली नाही, तर आम्ही वरिष्ठ पातळीवर तक्रार करू आणि लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू.असे संतप्त लाभार्थी यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितले.

## माजलगाव न.प.चा गटनेता कोण?

### गटनेता प्रकरणाच्या सुनावणीचा निकाल पुन्हा पुढे ढकलला

### नगरपालिकेतील विषय समितीच्या निवडी लांबणीवर

माजलगाव दि.६( प्रतिनिधी):- येथील नगरपालिकेत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेता प्रकरणावर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या सुनावणीत निकाल राखीव ठेवल्याने पालिकेतील विषय समितीच्या निवडी पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत.

दि.१२ जानेवारीला या पक्षाकडुन इम्रान आगा खान यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली होती. यानंतर छत्रपती कारखाना उपाध्यक्ष मोहन जगताप व उपनगराध्यक्ष सहाल चाउस यांच्यामध्ये झालेला वाद विकोपाला गेला. २७ जानेवारीला विषय समित्यांची निवड होणार होती. परंतु याच दिवशी माजलगाव विकास आघाडीचे प्रमुख सहाल चाउस यांनी नगरसेवक लतिफ सय्यद हुर यांची गटनेतेपदी निवड करण्यात यावी असे जिल्हाधिका-यांना पत्राव्दारे कळविले होते. यावर मोहन जगताप गटाने आक्षेप घेतला होता. या आक्षेपावर दि.५ फेब्रुवारी गुरूवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी झाली. यावेळी दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकुण घेत जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन यांनी गटनेता निवडीचा आदेश राखीव ठेवला असल्याने मात्र विषय समित्यांच्या निवडी लांबणीवर पडल्या आहेत तर गटनेता कोण राहणार ? या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान चाउस गटाकडुन ॲड. दिपक देशमुख यांनी बाजु मांडली तर जगताप गटाकडुन ॲड. विक्रम कदम यांनी बाजु मांडली. दरम्यान शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी इम्रान आगा खान हे पक्षाचे अधिकृत गटनेते असल्याचे पत्र दिले आहे.

## जामखेड शहर अतिक्रमणाच्या विळख्यात

### विकासकामे ही ठप्प ;अवधूत पवार यांचा आंदोलनाचा इशारा

जामखेड दि.५(प्रतिनिधी):- जामखेड शहरातून जाणाऱ्या जामखेड-सौताडा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डी या रस्त्याच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) शासकीय हद्द निश्चित करण्यात आली आहे. मात्र या हद्दीत मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य व अनधिकृत बांधकामे झाल्याने शहराच्या विकासकामांमध्ये गंभीर अडथळे निर्माण होत असून शहराचा सर्वांगीण विकास खुंटल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय महामार्गालगत नगरपरिषद हद्दीत दोन्ही बाजूस सुमारे दहा फूट जागा नगरपरिषदेच्या मालकीची असून ही जागा भुयारी गटार, सार्वजनिक पाणीपुरवठा योजना व फुटपाथसाठी राखीव आहे. मात्र सद्यस्थितीत या जागेत पक्की बांधकामे करण्यात आली आहेत. दरम्यान, भुयारी गटार व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेसाठी नगरपालिकेला सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असून कामे सुरू आहेत; परंतु अतिक्रमण हटविल्या शिवाय ही कामे पूर्ण होणे अशक्य आहे. तसेच ही मूलभूत कामे पूर्ण झाल्याशिवाय शहरातील अंतर्गत विकासकामांनाही गती देता येणार नाही.तसेच अतिक्रमणे वाचविण्याच्या हेतूने 'जिओ टॅगिंग'च्या गोंडस नावाखाली रोड सेंटर सरकविल्याने गटाराचे कामही विस्कळीत व वेडे वाकडे झाल्याचे निदर्शनास येत असल्याने कोठारी पेट्रोल पंप ते नवले पेट्रोल पंपापर्यंत दोन्ही

पान २ वर





## नेकनुरच्या दर्गा कॉलनीतील जि.प.उर्दू प्राथमिक शाळेत वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

बीड दि.५(प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील नेकनूर येथील सुपर हॉल या ठिकाणी वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास पहिले ते पाचवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमास नेकनूर येथील अनेक मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम पाहून या शाळेचे शालेय व्यवस्था समितीचे अध्यक्ष शेख मुखीद अबू, केंद्रप्रमुख इद्रिस सर, केंद्रमुख्याध्यापक रसाळ सर, शालेय व्यवस्था समिती सदस्य शेख रशीदोदिन, समाज सेवक शेख झफर पाशा व पालकांकडून शेख सदाम भाई यांनी विद्यार्थीच कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमास



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक मिर्झा हसनात खुर्शीद बैग व शिक्षक सय्यद अताउल्लाह सर व सर्व महिला शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात सर्व पालक व गावातील लोक सहभाग झाले होते.संस्कृती कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल मुख्याध्यापक मिर्झा हसनात खुर्शीद बैग यांनी सर्व विद्यार्थी, पालक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे आभार व्यक्त केले.

## शस्त्राचा धाक दाखवून लुटमार गुन्हेगाराला बीड शहर पोलिसांनी ठोकल्या बेड्या



बीड दि.५(प्रतिनिधी) - जिल्हा परिषद कार्यालयासमोर शस्त्राचा धाक दाखवून जबरदस्तीने साहित्य लुटणाऱ्या आणि जवळपास एक वर्षापासून हैदराबाद येथे फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला बीड शहर पोलिसांनी अटक केली आहे. सय्यद अनवर सय्यद मुजावर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अशोक

पान २ वर

## प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजींच्या उपस्थितीत कड्यात विविध कार्यक्रम

आष्टी/कडा दि.५(प्रतिनिधी):- कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळामध्ये जैन धर्माचे राष्ट्रसंत आचार्य सम्राट परमपूज्य आनंद ऋषीजी महाराज यांचे शिष्य प्रबुद्ध विचारक परमपूज्य श्री आदर्श ऋषीजी महाराज यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या पदाधिकारी यांनी दिली आहे . शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणात परमपूज्य आदर्शऋषीजी महाराज यांच्या उपस्थितीत कडा येथील बायसा व जमाईसा यांचा तसेच ज्येष्ठ श्रावक आणि श्राविका यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



याचवेळी अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या शाळेच्या इमारतीचे तसेच मुलांच्या आणि मुलींच्या वस्तीगृहाचे बांधकाम करण्याचा संकल्प आदर्श ऋषीजी म. सा. यांच्या उपस्थितीत केला जाणार आहे. तसेच बोर्डींगच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित केला आहे.

या समारंभासाठी प. पू. आदर्श ऋषीजी म. सा. यांच्यासह प. पू. उपप्रवर्तक अक्षय ऋषीजी महाराज, प. पू. अमृत ऋषीजी म. सा. प. पू. गीतार्थ ऋषीजी म. सा. तसेच महासतीजी उदय प्रभाजी महाराज आदी ठाणा, महासतीजी विपुल दर्शनाजी म. सा. आदी ठाणा हेही

पान २ वर

## आ.धस यांच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्त ट्रॅक्टर चालकाला दिलासा

पाटोदा दि.५(महेश बेदरे):- आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील गोरगरीब व गरजू रुग्णांसाठी आ.सुरेश (आण्णा) धस हे सातत्याने आधारस्तंभ ठरत असून, त्यांच्या प्रयत्नांतून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच विविध शासकीय योजनांद्वारे गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्याची प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे. या उपक्रमांचा मोठा लाभ सर्वसामान्य कुटुंबांना होत आहे. चिखली येथील रहिवासी व ट्रॅक्टर चालक कृष्णा बाळू चखाले यांचा २३ जानेवारी रोजी अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर अहिल्यानगर येथील श्री दीप हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.





पान २ वर

## कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या समस्यांकडे केंद्र सरकारने लक्ष द्यावे

### ऑल इंडिया ग्रो इनपुट डीलर्स असोसिएशनचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना निवेदन

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसेवा):- देशातील लाखो कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या व्यावहारिक अडचणी सोडवण्यासाठी आणि प्रस्तावित 'बियाणे विधेयक २०२५' व 'कीटकनाशक व्यवस्थापन विधेयक २०२५' मध्ये सुधारणा करण्यासाठी ऑल इंडिया ग्रो इनपुट डीलर्स असोसिएशनच्या वतीने केंद्रीय कृषिमंत्री माननीय शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन देण्यात आले.

या शिष्टमंडळात राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री, राष्ट्रीय कोषाध्यक्ष आबासाहेब भोकरे, मध्य प्रदेशाध्यक्ष मानसिंह राजपूत, महाराष्ट्र महासचिव विपिन कासलीवाल आणि मध्य प्रदेश संचालक देवेन वर्मा यांचा समावेश होता.निवेदनातील प्रमुख मागण्या- जबाबदारीचे स्पष्ट निर्धारण: विक्रेते कंपन्यांकडून आलेले 'सील्ड पॅक' मालच विकतात. त्यामुळे प्रयोगशाळा तपासणीत गुणवत्ता कमी आढळल्यास त्याची पूर्ण जबाबदारी उत्पादक कँपनीची असावी, विक्रेत्याची नाही.अवैध विक्रीवर कठोर निर्बंध:



विनापरवाना बियाणे किंवा कीटकनाशके विकणाऱ्या घटकांमुळे वैध व्यावसायिकांचे नुकसान होते. अशा अवैध विक्रेत्यांवर कठोर सजा आणि दंड आकारण्याची मागणी करण्यात आली आहे.

पान २ वर

## धारूर शहरातील पेठ विभाग शिवजयंतीच्या अध्यक्षपदी गुलाब गायकवाड तर सचिवपदी फावडे

किल्ले धारूर दि ५ (प्रतिनिधी )- शहरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग शिवजयंतीची कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली आहे .दि.५ जानेवारी रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत विविध पदांच्या नियुक्तया संपन्न झाल्या.यात समिती अध्यक्षपदी गुलाब गायकवाड, उपाध्यक्ष माऊली औताडे,कोषाध्यक्ष पवन औताडे, सचिव रोहित फावडे यांची नियुक्ती करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरी करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव पेठ विभाग किल्ले धारूर वतीने शिवजयंती थाटामाटात करण्यात येणार आहे त्याच अनुषंगाने ५ जानेवारी वार गुरुवार रोजी शिवजन्मोत्सव आयोजित बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक अर्जुन गायकवाड,





पान २ वर

## सवसवाडी येथे ओंकारेश्वर शिवमंदिरात शुक्रवारी महादेव,नंदी मूर्ती प्राणप्रतिष्ठा

बीड दि.५ (प्रतिनिधी):- शिरूर कासार तालुक्यातील सवसवाडी येथे श्री महादेव, नंदी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांच्या शुभहस्ते होणार आहे. तर आष्टी, पाटोदा शिरूर चे आ. सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे. सवसवाडी येथे भाविक भक्तांनी लोकवर्गणी करून नव्यानेच भव्य शिवमंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामध्ये श्री महादेव, नंदी मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने दिनांक ५ फेब्रुवारी रोजी सकाळी मूर्तीची शोभायात्रा, कुंडसंस्कार, होमहवन आदी कार्यक्रम झाले. तर दिनांक ६ रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व होमहवन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ५१ फूट उंच धर्मध्वज आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते उभारण्यात येणार आहे. या कार्यक्रमा नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तालुक्यातील व परिसरातील भाविक भक्तांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सवसवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



## लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी डॉ.गणेश ढवळे यांची निवड



लिंबागणेश दि ५(प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात गुरुवार, दिनांक ५ रोजी सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली, तर सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी त्यास अनुमोदन दिले. ग्रामस्थांनी एकमुखाने त्यांच्या नावाला पाठिंबा दिला.

पान २ वर

## पाटोदा प्रीमियर लीगचा 'संघर्ष योद्धा'विजेता

### थरारक अंतिम लढतीत अण्णा वॉरियर्सवर मात; पर्व ७ स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पाटोदा दि.५(प्रतिनिधी):- आ.सुरेश धस यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव व पाटोदा स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने आयोजित पाटोदा प्रीमियर लीग - पर्व सात (२०२६) ही भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा खेळाडूंच्या जिद्दीने आणि प्रेक्षकांच्या जल्लोषात यशस्वीरीत्या पार पडली. प्रत्येक सामन्यात दिसून आलेली शिस्त, जोश आणि खेळाडूपणा या स्पर्धेची खास ओळख ठरली आ. सुरेश धस यांच्या अभिष्टचिंतन निमित्त मागील सहा वर्षांपासून ही स्पर्धा सातत्याने आयोजित केली जाते. या रंगतदार स्पर्धेत संघर्ष योद्धा संघाने सातत्यपूर्ण व आक्रमक खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकावले, तर अण्णा वॉरियर्स संघाने उपविजेतेपद मिळवले. सौर्य आणि मयूर नायगाव या संघांनीही दमदार कामगिरी करत अव्वल चारमध्ये आपले स्थान पक्के केले.स्पर्धेचा भव्य अंतिम सामना संघर्ष



पान २ वर

CMYK